१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ NAVAKAL

• पुणे, मंगळवार ५ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३१९, पाने-८, किंमत : ₹ ६

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 319, Marathi - Daily - Pune, 5 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## पहिली बुलेट ट्रेन लवकरच! रेल्वेमंत्री वैष्णव यांची माहिती



**भावनगर-** देशातील पहिली मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन लवकरच धावणार, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी येथे दिली. गुजरातच्या भावनगर टर्मिनसवरून वैष्णव यांनी आज तीन नवीन रेल्वे सेवांचे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उद्घाटन केले. त्याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात वैष्णव बोलत होते.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. लवकरच ही रेल्वे सेवा सुरू होणार आहे. या रेल्वे सेवेमुळे मुंबई आणि अहमदाबाद या दोन मोठ्या शहरांमधील अंतर अवघे दोन तास आणि ७ मिनिटांत पार करता येणार आहे, असे वैष्णव यांनी सांगितले. मात्र लवकरच म्हणजे नेमके कधीपासून बुलेट ट्रेन सुरू होणार हे सांगण्याचे त्यांनी टाळले.

## मेट्रोच्या नावातून नेहरू-गांधी वगळले! संजय राऊत यांचा घणाघात



**मुंबईतील मेट्रो रेल्वे मार्गांवरील स्थानकांना नाव देताना जाणूनबुजून पंडित नेहरू व महात्मा गांधी यांची नावे वगळण्यात आली. या प्रमाणात त्यांचा द्वेष होत आहे असा आरोप आज उबाठा नेते संजय राऊत यांनी केला.**

■ मुंबई

**ते** म्हणाले की, राज्यातील महायुतीच्या सरकारने वरळीतील सुप्रसिध्द नेहरू सायन्स सेंटरलगत जे मेट्रो रेल्वेचे स्थानक आहे त्याला नेहरूंचे नाव वगळून नुसते सायन्स सेंटर असे नाव दिले आहे. तर बोरीवलीतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाबाबतही असेच केले आहे. तेथे संजय गांधी हे नाव वगळून मेट्रो स्थानकाला केवळ राष्ट्रीय उद्यान मेट्रो स्थानक असे नाव देण्यात आले आहे. यातून राज्यकर्त्यांचा नेहरू व गांधी द्वेष किती टोकाचा आहे हेच दिसून येते. असे द्वेषाचे राजकारण करणारे राज्यकर्ते लाभले हे महाराष्ट्राचे आणि देशाचे दुर्दैव आहे, अशी खंत राऊत यांनी व्यक्त केली.

सप्टेंबरमध्ये देशात मोठ्या राजकीय घडामोडी घडू शकतात, असे संकेत देत ते म्हणाले की, या घडामोडी नेमक्या कोणत्या याबद्दल आता सांगत नाही.

भाजपा खासदार निशिकांत दुबे यांच्या वक्तव्याबद्दल छेडले असता ते म्हणाले की, दुबे हा दलाल आहे. असे किती दुबे आले आणि गेले. १०६ हुतात्म्यांचे बलिदान देऊन मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळविला आहे. त्यात एकही दुबे, चौबे किंवा मिश्रा नव्हता. मराठी माणूस, गिरणी कामगार छातीचा कोट करून लढला. तुमच्या राज्यात नोकऱ्या - रोजगार नाहीत म्हणून तुम्ही मुंबईत येता. तुम्ही मुंबईला भव्य दिव्य बनवण्यासाठी नव्हे तर स्वतःचे पोट भरण्यासाठी येता. येथे पैसे कमावता आणि उत्तर प्रदेश-बिहारमध्ये नेता. त्यामुळे महाराष्ट्र आणि मराठी माणसाबद्दल वावगे बोलायचा तुम्हाला अधिकार नाही, असे राऊत म्हणाले.

# ओबीसी आरक्षणाला मान्यता नवीन प्रभाग रचनेनुसार निवडणूक

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गेल्या तीन-चार वर्षांपासून रखडलेल्या निवडणुका लवकरात लवकर घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. आज या निवडणुकांमधील ओबीसी आरक्षण आणि नव्या प्रभाग रचनेवरून निर्माण झालेले अडथळेही सर्वोच्च न्यायालयाने दूर केले. २७ टक्के ओबीसी आरक्षण आणि नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या दोन याचिका न्यायालयाने फेटाळल्या. त्यामुळे निवडणुका ओबीसी आरक्षणासह नव्या प्रभाग रचनेनुसारच होणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे. आता निवडणुकांचा मार्ग पूर्ण मोकळा झाला आहे.**

■ नवी दिल्ली

**लातूर** जिल्ह्यातील औसा नगरपालिकेच्या निवडणुकीसंदर्भात एक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. या याचिकेत ११ मार्च २०२२ च्या वॉर्ड रचनेनुसार निवडणूक घेण्याची मागणी करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी झाली असता सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली. ही निवडणूकही नवीन वॉर्ड रचनेप्रमाणे घेण्यात यावी, असे निवडणूक आयोगाने अधिसूचित केले होते. त्यामुळे आजच्या आदेशाप्रमाणे नवीन वॉर्ड/ प्रभाग रचनेनुसार निवडणुका होतील, हे न्यायालयाने स्पष्ट केले. वॉर्ड रचना कशी असावी हा अधिकार पूर्णपणे राज्य सरकारचा आहे. प्रभाग रचना राज्य सरकार ठरवेल, त्यानुसारच निवडणुका होईल. राज्य विधिमंडळाने तसा कायदा केला आहे आणि या कायद्याला स्थगिती नाही, असाही निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसी आरक्षणाला आव्हान देणारी याचिकादेखील सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणासह घेऊ नयेत, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, आमच्या ६ मे २०२५ च्या आदेशानुसार

पान ७ वर



### नेमका निकाल काय?

- नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळल्या.
- २७ टक्के ओबीसी आरक्षणाला विरोध करणारी याचिका फेटाळली.
- २७ टक्के ओबीसी आरक्षणानुसारच निवडणुका होतील.
- ११ मार्च २०२२ च्या प्रभाग रचनेनुसार निवडणुका होणार नाहीत.
- ६ मे रोजीच्या आदेशानुसार २७ टक्के ओबीसी आरक्षणासह निवडणुका होतील.



मुंबईतील प्रसिद्ध परेलच्या मोरयाचे काल वाजतगाजत आगमन

## चिनी कंपनीशी भागीदारी नाही अदानी समूहाकडून स्पष्टीकरण

**मुंबई -** अदानी समूह दोन चिनी कंपन्यांबरोबर भागीदारी करणार असल्याचे ब्लूमबर्ग या अमेरिकेतील वृत्तसंस्थेने दिलेले वृत्त चुकीचे व निराधार असल्याचा खुलासा अदानी समूहाने केला आहे.

अदानी समूहाने म्हटले की, अदानी समूह चीनमधील बीवायडी व बीजिंग वेलिओन न्यू एनर्जी टेक्नोलॉजी बरोबर भागीदारी करणार असल्याचे वृत्त त्यांनी आज दिले आहे. आम्ही या वृत्ताचा इन्कार करत असून हे वृत्त निराधार, चुकीचे व दिशाभूल करणारे आहे.

## झारखंड निर्मिती चळवळीचे नेते, माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे दीर्घ आजाराने निधन

■ रांची

**झारखंड** निर्मिती चळवळीतील नेते आणि माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन (८१) यांचे आज सकाळी ९ वाजताच्या सुमारास दिल्लीतील रुग्णालयात मूत्रपिंडाशी संबंधित दीर्घआजाराने निधन झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या मृत्युबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांच्या निधनाची माहिती त्यांचे पुत्र आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी एक्स पोस्टद्वारे दिली. त्यांनी लिहिले की, आदरणीय



दिशोम गुरू आपल्या सर्वांना सोडून गेले. मी आज पूर्णपणे शून्य झालो आहे.

राज्यसभेचे विद्यमान खासदार शिबू सोरेन अनेक वर्षांपासून मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त होते. महिनाभरापूर्वी आलेल्या ब्रेन स्ट्रोकमुळे उपचारासाठी त्यांना दिल्लीतील सर गंगाराम रुग्णालयात दाखल केले होते. दिशोम गुरू (महान नेता) या नावाने ओळखले जाणारे शिबू सोरेन यांनी तीन वेळा झारखंडचे मुख्यमंत्रिपद भूषवले. २००५ मध्ये त्यांनी राज्याचे तिसरे मुख्यमंत्री शपथ

पान ७ वर

## आठवड्याच्या सुरुवातीला शेअर बाजारात मोठी वाढ

■ मुंबई

**गेल्या** आठवड्यातील घसरणीनंतर आज नव्या आठवड्याच्या पहिल्याच दिवशी देशांतर्गत शेअर बाजारात जोरदार वाढ दिसून आली. या वाढीमुळे सेन्सेक्स आणि निफ्टी हे दोन्ही प्रमुख निर्देशांक वाढीसह बंद झाले.

मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स आज ४१९ अंकांच्या वाढीसह ८१,०१९ अंकांवर तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी १५७ अंकांनी वाढून २४,७२३ अंकांवर बंद झाला. बँक निफ्टीमध्ये आज ७९५ अंकांची घवघवीत वाढ झाली. बँक निफ्टी आज ५७,४३२ अंकांवर स्थिरावला. आजच्या व्यवहारांवरून बाजारातील विक्रीचा दबाव कमी होऊन खरेदीचा जोर वाढल्याचे दिसून आले.

## भारतीय संघाने विजयश्री खेचून आणली ६ धावांनी विजय! कसोटी मालिका बरोबरीत

■ लंडन

**ओव्हल** क्रिकेट मैदानावर झालेल्या तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफीच्या पाचव्या आणि अखेरच्या कसोटीत आज अखेरच्या दिवशी मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णाच्या अफलातून गोलंदाजीच्या जोरावर भारतीय संघाने ६ धावांनी इंग्लंडच्या जबड्यातून विजय हिसकावून घेतला. त्यामुळे भारतीय संघाने या कसोटी मालिकेत २-२ ने बरोबरी साधली. विजयापासून ३५ धावांनी दूर असलेल्या इंग्लंडला ४ गडी शिल्लक असूनही आज २९ धावाच करता आल्या. इंग्लंडचा डाव सर्वबाद ३६७ धावांवर आटोपला.

भारतीय संघाने इंग्लंडला विजयासाठी ३७४ धावांचे आव्हान दिले. काल चौथ्या दिवशी जो रूटने १०५ आणि हॅरी ब्रूकने १११ धावा ठोकल्यामुळे इंग्लंडने ७६.२ षटकांत ६ बाद ३३९ धावा केल्या होत्या. चौथ्या दिवसाखेरपर्यंत इंग्लंडचा संघ वरचढ होता. मात्र भारतीय संघाला विजयासाठी ४ विकेट बळी टिपण्याची गरज होती. आजचा पाचवा दिवशी मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रभावी

पान ४ वर



## संसद भवनाजवळ महिला खासदाराची सोनसाखळी खेचली

■ नवी दिल्ली

संसद भवनापासून काही अंतरावर असलेल्या चाणक्यपुरी परिसरात काँग्रेसच्या महिला खासदार आर. सुधा यांच्या गळ्यातील सोनसाखळी चोराने हिसकावण्याची धक्कादायक घटना आज घडली. सध्या दिल्लीत संसदेचे अधिवेशन सुरू असल्याने या परिसरात कडेकोट सुरक्षा असताना हा प्रकार घडल्याने खळबळ उडाली आहे.

तामिळनाडूच्या मयीलाडूतुरै मतदारसंघाच्या खासदार असलेल्या सुधा या मॉर्निंग वॉकला गेल्या असताना सकाळी सहा वाजताच्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील साखळी खेचून पलायन केले. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला असून, दिल्ली पोलिसांच्या १० पथकांकडून शोध सुरू आहे. चोरट्याच्या शोधासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे. या घटनेनंतर काँग्रेस खासदार प्रियांका गांधी या आर. सुधा यांना थेट लोकसभा अध्यक्षांकडे घेऊन गेल्या आणि त्यांच्याकडे घटनेबाबत तक्रार केली. सुधा यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनाही पत्र पाठवले आहे.

## मराठीआधी हिंदीला ओळख अविमुक्तेश्वरानंदांचे वक्तव्य

■ नवी दिल्ली

**महाराष्ट्रात** मराठी आणि हिंदी भाषेवरून वाद सुरू असताना शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी एक वादग्रस्त वक्तव्य केले आहे. हिंदी भाषेला मराठी भाषेच्या आधी राजभाषेचा दर्जा मिळाला आहे. तेव्हा महाराष्ट्र अस्तित्वातदेखील नव्हता, असे अविमुक्तेश्वरानंद म्हणाले.

हिंदी आणि मराठी भाषेचा इतिहास पाहिला असता असे लक्षात येते की, हिंदी भाषेला आपल्या देशात राजभाषा म्हणून आधी ओळख मिळाली आहे. १९६० मध्ये जेव्हा महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेव्हा मराठी भाषेला राज्यभाषेचा दर्जा मिळाला, असे अविमुक्तेश्वरानंद म्हणाले. याप्रसंगी अविमुक्तेश्वरानंद यांनी काँग्रेसवर नाव न घेता टीका केली. देशाचे दोन तुकडे ज्यांच्यामुळे झाले ते आम्ही नाही.

## पालिकेत शंभर टक्के सत्ता येणार मनसे मेळाव्यात राज ठाकरेंचा विश्वास

■ मुंबई



**आगामी** निवडणुकीत मुंबई महानगरपालिकेवर शंभर टक्के मनसेचीच सत्ता येणार, असा ठाम विश्वास मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात झालेल्या पदाधिकारी मेळाव्यात व्यक्त केला. उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेशी युतीबाबत योग्य वेळी सूचना देऊ, असे राज यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले.

या मेळाव्यात कार्यकर्ते, पदाधिकारी आणि विभाग अध्यक्षांनी कशा प्रकारे निवडणुकीला सामोरे जायचे याचे मार्गदर्शन राज ठाकरे यांनी केले. आपापसातील सर्व हेवेदावे विसरून निवडणुकीच्या कामाला लागा. मराठीचा मुद्दा घरोघरी पोहोचवा. मात्र मराठीचा आग्रह धरताना हिंदी भाषिकांचा द्वेष करू नका. कुणालाही न घाबरता पक्षाचे काम ताकदीने करा, अशा सूचना राज ठाकरे यांनी यावेळी दिल्या. मुंबई महानगरपालिकेवर शंभर टक्के सत्ता आपलीच येणार आहे. युतीचे काय करायचे ते तुम्ही माझ्यावर सोडा. योग्य वेळी त्याबद्दलच्या सूचना तुम्हाला दिल्या जातील, असे सांगताना २० वर्षांनंतर आम्ही दोघे भाऊ एकत्र येऊ शकतो तर तुम्ही का नाही, असे म्हणत शिवसेनेशी जुळवून घेण्याची भावना राज ठाकरे यांनी व्यक्त केली.

## विमानात आढळले झुरळ एअर इंडियाकडून माफी

■ मुंबई


**एअर** इंडियाच्या सॅनफ्रान्सिस्को ते मुंबई विमानातील दोन प्रवाशांना झुरळ आढळल्याने एअर इंडियाने माफी मागितली आहे. कोलकात्यात या विमानाची पूर्ण स्वच्छता केल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

एअर इंडियाच्या प्रवक्त्याने म्हटले की, सॅनफ्रान्सिस्कोहून कोलकाता मार्गे मुंबईला येणाऱ्या एआय १८० या विमानात दोन प्रवाशांना लहान झुरळ आढळले. या प्रवाशांनी ही बाब विमान कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणल्यानंतर त्यांची जागा बदलण्यात आली. त्यानंतर विमान कोलकाता येथे इंधन भरण्याकरता थांबल्यानंतर विमानाची बारकाईने स्वच्छता करण्यात आली. त्यानंतर विमान वेळेवर मुंबईसाठी रवाना झाले. विमानतळावरील कामकाजादरम्यान कधी कधी विमानात असे लहान किटक शिरतात.

## ऑपरेशन महादेवमध्ये ठार झालेले पहलगामचे हल्लेखोर पाकिस्तानीच

■ नवी दिल्ली

ऑपरेशन महादेवमध्ये ठार झालेले पहलगाम हल्ल्यातील तीन हल्लेखोर पाकिस्तानी असल्याचे सुरक्षा यंत्रणांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे पहलगाम हल्ल्यामागे पाकिस्तानचा सहभाग असल्याचा आणखी एक पुरावा उघड झाला आहे. २८ जुलै रोजी श्रीनगरजवळील डाचिगाम जंगल परिसरात ऑपरेशन महादेव दरम्यान झालेल्या चकमकीत हे तीन दहशतवादी ठार झाले होते.



अहवालात स्पष्ट पुरावे

२२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम हल्ल्यानंतर हे तिघे डाचिगाम-हरवण जंगल पट्ट्यात लपून बसले होते. या अहवालानुसार, मुख्य सुत्रधार व ए + + दर्जाचा सुलेमान शाह ऊर्फ फैझल जट्ट, दहशतवादी कमांडर व 'ए' दर्जाचा अबू हमझा ऊर्फ अफगाण आणि दहशतवादी कमांडर 'ए' दर्जाचा यासिर ऊर्फ जिब्रान हे पहलगाम हल्ल्याशी

पान ७ वर

## ठाकरे यांचे राजकारण संपणार निशिकांत दुबेंनी पुन्हा डिवचले

■ मुंबई

**गेले** काही दिवस सातत्याने महाराष्ट्र, मराठी माणूस आणि मराठी भाषेच्या विरोधात वक्तव्य करणारे, परराज्यांत गेल्यास ठाकरे बंधुंना लोक मारतील, असे म्हणून आगीत तेल ओतणारे भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी पुन्हा एकदा ठाकरे बंधुंना डिवचले. मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीनंतर ठाकरे बंधुंचे राजकारण संपुष्टात येईल, अशा शब्दांत दुबे यांनी उध्दव आणि राज ठाकरेंवर निशाणा साधला.

मुंबईत भाषेच्या आधारावर राजकारण करणे यापुढे चालणार नाही. मुंबईत मराठी भाषा बोलणारे अवघे २० टक्के लोक आहेत. येथे १२ टक्के मुस्लीम आहेत. ते त्यांची हिंदी बोलतात. तर ३० टक्के लोक प्रचलित हिंदी भाषा बोलतात. उर्वरित लोक त्यांच्या त्यांच्या भाषा बोलतात. त्यामुळे मुंबईवर मराठी भाषेची मक्तेदारी राहिलेली नाही. मुंबईला जे वैभव प्राप्त झाले आहे त्यात उत्तर प्रदेश आणि बिहारी लोकांचे मोठे योगदान आहे. आगामी महापालिका निवडणुकीत अमराठी मतदार ठाकरे बंधुंच्या विरोधात मतदान करणार. मुंबई महापालिका महायुतीच जिंकणार. त्यामुळे ठाकरे बंधुंचे राजकारण संपणार, असे दुबे म्हणाले.

## राहुल गांधींच्या विधानावर सुप्रीम कोर्टाकडून ताशेरे



■ नवी दिल्ली

चीनने भारताची जमीन हडप केली हे तुम्हाला कसे कळले? तुम्ही विरोधी पक्षनेते आहात. त्यामुळे असे प्रश्न तुम्ही समाजमाध्यमावर नाही तर संसदेत उपस्थित केले पाहिजेत. अशा शब्दांत आज सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांना कानपिचक्या दिल्या. सर्वोच्च न्यायालयाने लखनौ न्यायालयातील सुनावणीला स्थगिती दिली असून, उत्तर प्रदेश सरकार व तक्रारदाराला नोटीसही पाठवली आहे.

राहुल गांधी यांनी त्यांच्या भारत जोडो यात्रेदरम्यान, चीनने भारताची जमीन हडपली असून, चिनी सैनिक अरुणाचल प्रदेशात भारतीय सेनेच्या जवानांना मारत आहेत, असे विधान केले होते. यावर लखनौ न्यायालयात त्यांच्या विरोधात बदनामीचा दावा दाखल करण्यात आला. त्याला आव्हान देणाऱ्या याचिकेची सुनावणी आज सर्वोच्च न्यायालयात झाली. न्या. दीपांकर दत्ता व न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या पीठाने म्हटले की, चीनने भारताची २००० चौरस किलोमीटर जमीन व्यापली हे तुम्हाला कसे कळले? तुमच्याकडे काही विश्वासार्ह माहिती आहे का? कोणताही खरा भारतीय अशा प्रकारे बोलणार नाही. तुम्हाला जे काही बोलायचे आहे ते तुम्ही संसदेत बोला. तुम्हाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे म्हणून तुम्ही काहीही बोलता कामा नये.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

कुरिअर कंपनीमध्ये पिकअप व डिलिव्हरीसाठी त्वरीत मुले पाहिजेत. ठिकाण-फोर्ट, दादर, लोअरपरेल, वडाळा, नवीमुंबई. दररोज रोख 600 + प्रवास खर्च. Speedman Express 191-B, 9th Cavel Cross Lane, 1st Floor, Dr. Viegas Street, Near Barretto High School, Chirabazar, Mumbai - 400002. Note - फोन न करता ऑफिसमध्ये येणे. {NC251577}

SBI बँकेत ऑफिस कामासाठी लोकांची भर्ती 15,000/- ते 35,000/- **9702279241** {NC251804}

कंपनीत डस्टिंग आणि जेवण बनविण्यासाठी महिला पाहिजे. संपर्क - **9820930362** {NC251714}

पेस्ट कंट्रोल ऑपरेटरसाठी अनुभवी/बिनअनुभवी कामगार पाहिजेत. गिरगाव **9820534868/ 9833832512** {NC250051}

पेस्टिंग, बुकबाईंडिंग/कार्टन पेस्टिंगच्या कामात अनुभवी पेस्टर, कारीगर व हेल्पर पाहिजेत. वेतन 20,000/- संपर्क - **9324804795** {NC251849}

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (22,000-75,000) **9820628009 / 9833470199** {NC251844}

कॉलेज करता करता आमच्या सोबत पार्ट टाईम काम करा. कामा सोबत ज्ञान व भाषा कौशल्य संपादन करा. संपर्क - **9702527373.** {NC251845}

**डीएचएलसाठी ऑफिसबॉय पाहिजेत. पगार 20000/-, 8 तास. संपर्क 7208551929, 9702126571** {NC251847}

मस्जिद बंदर मधील दुकानामध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर मुलगी पाहिजे. संपर्क - **8422976003** {NC251850}

## Situation Vacant

Borivali (West) required Assistant Tally Accountant 2 years' experience. Resume: **9892797851.** {NC251811}

Required Delivery Boy in Kandivali West. Attractive Salary Contact: **7506725068/ 9869340709** {NC251833}

Full / Part Time Fresher Females Staff Required at Kalbadevi **8169968403** {NC251848}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC251851}

## व्यवसायविषयक

शाळांना लागणारी स्टेशनरी बनवणाऱ्या नामवंत मॅन्युफॅक्चरींग कंपनीला मुंबई/ पालघर जिल्ह्यात कमिशन वरती काम करणारे विश्वासू पुरुष/ महिला पाहिजेत. ज्या ठिकाणी राहता त्याच विभागात काम करून महिन्याला लाखो रुपये कमवण्याची सुवर्णसंधी अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटा: **8693009342/ 9082787983** {NC251443}

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा- दादर- **8652643434 / 9967437950** {NC251713}

घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना 30 - 35 हजार कमवा दोन वर्षाचे ॲग्रीमेंट **- 9028160157** {NC251846}

## कर्जविषयक

आधारकार्ड आणि पॅनकार्डवर लोन मिळवा चार दिवसांत. संपर्क: **8450983443.** {NC251829}

## वधूवर मेळावा

वधु वर मेळावा सर्वजाती मुलींना फ्री APP कल्याण **9869868620** {NC251837}


**इव्ह इव्होन मॅडे डी मारोस यांचे मूळ नाव होते. त्यांचे वडील आंद्रे डी मॅडे हे जिनिव्हा विद्यापीठातील समाजशास्त्राचे प्रतिष्ठित हंगेरियन प्राध्यापक होते; तर त्यांच्या आई मार्थे हेन्जेल्ट या जिनिव्हा येथील इन्स्टिट्यूट जीन-जॅक रुसो येथे रशियन शिक्षणतज्ज्ञ होत्या. इव्ह इव्होन मॅडे डी मारोस यांची 'सावित्री' होण्यामागची कथाही मोठी रंजक आहे. जागतिक महायुद्धाच्या दरम्यान, इव्ह इव्होन मॅडे डी मारोस या मेजर जनरल विक्रम खानोलकर यांच्या प्रेमात पडल्या. विक्रम खानोलकर हे ब्रिटनमधील रॉयल मिलिटरी अकादमीत प्रशिक्षण घेत होते. इव्ह इव्होन मॅडे डी मारोस यांच्या कुटुंबियांचा या लग्नाला विरोध होता. मात्र, तरीही मारोस यांनी धाडसाने विक्रम खानोलकर यांच्याशीच लग्न करणे पसंत केले.**





# परमवीर चक्राची रचना करणाऱ्या सावित्री खानोलकर

संजीव वेलणकर पुणे

एका दूरच्या देशात जन्म होऊन भारतात आलेल्या सावित्रीबाईंना इथल्या देशाशी जुळवून घेण्यात तशा फारशा अडचणी आल्या नाहीत. याउलट अल्पावधीतच त्यांचे भारताचा इतिहास आणि संस्कृतीशी घट्ट नाते प्रस्थापित झाले. त्यांनी भारतीय पौराणिक कथा, परंपरा आणि धार्मिक ग्रंथांचा प्रचंड अभ्यास केला. त्यांनी स्वत: शाकाहारी जीवनशैलीही स्वीकारली.

त्या विक्रम खानोलकर यांच्या पाठोपाठ भारतात परतल्या. १९३२ मध्ये त्यांनी विक्रम खानोलकर यांच्याशी लग्न केले. या लग्नानंतर त्यांना सावित्रीबाई खानोलकर हे नाव मिळाले. त्यानंतर त्यांचे उर्वरित आयुष्य भारतातच गेले.

त्यांना अस्खलित मराठी, संस्कृत आणि हिंदी भाषा येत होत्या. याबरोबरच त्यांनी भारतीय संगीत, नृत्य आणि चित्रकलादेखील शिकून घेतली. निवृत्त स्क्वाड्रन लीडर पी. ए. पाथ्रीकर या नेहमी असं म्हणायच्या की, त्या चुकून युरोपामध्ये जन्माल्या आल्या होत्या. कुणी त्यांना परदेशी म्हटल्यास त्यांना वाईट वाटायचे; कारण त्यांचा आत्मा खऱ्या अर्थाने भारतीयच होता.

भारतीय संस्कृती आणि इतिहासाबाबत सावित्रीबाईंना सखोल जाण होती. त्यामुळे १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मेजर जनरल हिरा लाल अटल यांनी लढाईतील शौर्य पदक तयार करण्यासाठी त्यांची मदत घेतली. ब्रिटनच्या व्हिक्टोरिया क्रॉसची जागा घेणारा भारताचा लष्करी पुरस्कार तयार करण्याचे काम सावित्रीबाईंना सोपवण्यात आले. सावित्रीबाई खानोलकर यांनी भारताचा सर्वोच्च लष्करी पुरस्कार तयार करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याकडून प्रेरणा घेतली होती. शिवाजी महाराजांचा सन्मान करण्यासाठी त्यांनी पदकाच्या दोन्ही बाजूला महाराजांची 'भवानी' ही पौराणिक तलवार समाविष्ट केली. या तलवारीच्या बाजूला इंद्र देवाच्या 'वज्र' या शक्तिशाली पौराणिक शस्त्राचाही समावेश केला.

नॅशनल वॉर मेमोरिअलने नमूद केल्याप्रमाणे, सावित्रीबाईंना वैदिक ऋषी दधीची यांच्याकडून प्रेरणा मिळाली होती. दधीची ऋषी यांनी आपल्या शरीराचा त्याग करून परम यज्ञ केला होता; जेणेकरून देवांना त्यांच्या मणक्यातून 'वज्रा' या घातक शस्त्राची निर्मिती करता येईल.



परमवीर चक्राच्या रचनेमध्ये गोलाकार कांस्य तबकडीचा वापर करण्यात आला आहे. या तबकडीचा व्यास १.३७५ इंच (३.४९ सेमी) आहे. त्याला ३२ मिमी जांभळ्या रंगाची रिबन लावलेली असते. योगायोग म्हणजे भारताच्या पहिल्या प्रजासत्ताकदिनी म्हणजेच २६ जानेवारी १९५० रोजी पहिले परमवीर चक्र सावित्रीबाईंच्याच एका नातेवाईकांना प्रदान करण्यात आले होते. सावित्रीबाईंची मोठी मुलगी कुमुदिनी शर्मा यांचे मेहुणे मेजर सोमनाथ शर्मा यांना १९४७-४८ च्या काश्मीरमधील भारत-पाक युद्धातील शौर्याबद्दल हे चक्र प्रदान करून मरणोत्तर सन्मानित करण्यात आले होते.

सावित्रीबाईंनी फक्त परमवीर चक्रच नव्हे तर आणखीही प्रतिष्ठित शौर्य पदकांची रचना केली होती. त्यामध्ये महावीर चक्र, वीर चक्र, अशोक चक्र, कीर्ती चक्र आणि शौर्य चक्र यांचा समावेश होतो. सावित्रीबाईंचा सामाजिक कार्यातही मनापासून सहभाग होता. त्यांनी नंतरची बरीच वर्षे सैनिकांना, त्यांच्या कुटुंबियांना आणि फाळणीदरम्यान विस्थापित झालेल्या निर्वासितांना मदत करण्यासाठी समर्पित केली. १९५२ मध्ये पतीच्या निधनानंतर त्यांनी रामकृष्ण मिशनमध्ये सामील होऊन अध्यात्मात आपले मन रमवले. त्यांनी 'महाराष्ट्रातील संत' नावाचे पुस्तकही लिहिले होते. हे पुस्तक आजही लोकप्रिय आहे.सावित्री खानोलकर यांचे निधन २६ नोव्हेंबर १९९० रोजी झाले.



# आजचे राशी भविष्य

मंगळवार दि.५ ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | महत्त्वाच्या कामांमध्ये अडचणी उद्भवू शकतात. दुपारनंतर अचानक प्रवास घडू शकतो. धार्मिक यात्रा करण्याचे योजाल. |
| वृषभ | दुपारपूर्वी महत्त्वाची कामे करून घ्या. तुम्ही केलेल्या योजना सफल होतील. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| मिथुन | कार्यक्षेत्रात काही प्रमाणात स्थित्यंतरे जाणवतील. तुमच्या बोलण्याने अनेक कामे मार्गी लागतील. विवाहोत्सुक मंडळींना अनुकूल दिवस. |
| कर्क | तुम्ही केलेल्या योजना पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. भावंडांचे सहकार्य राहील. आरोग्यासाठी खाण्याबाबत पथ्य सांभाळावे लागेल. |
| सिंह | व्यवसायामध्ये नवीन आव्हाने पेलण्यास सक्षम राहाल. तुमच्या बोलण्याने इतरांचे मन दुखावले जाणार नाही याची काळजी घ्या. खर्चावर नियंत्रण आवश्यक. |
| कन्या | उत्साहाच्या भरात अति मेहनत करू नका. आरोग्य संभाळा. नोकरीत मेहनत घ्यावी लागेल. |
| तूळ | आर्थिक गुंतवणूक करणे तूर्तास पुढे ढकला. कार्यक्षेत्रात नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. काहींना आरोग्याच्या तक्रारी उद्भवतील. |
| वृश्चिक | व्यवसायामध्ये काही बदल होऊ शकतात. आर्थिक लाभाचे प्रमाण साधारण राहील. जोडीदाराच्या आरोग्याची चिंता वाटेल. |
| धनु | मनात सकारात्मक विचार ठेवा. एखाद्या धार्मिक ठिकाणी भेट देण्याचे योजाल. कार्यक्षेत्रात वरिष्ठांशी मतभेद टाळावेत. |
| मकर | नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी राखाल. व्यवसायात अधिक परिश्रम घ्यावे लागतील. आरोग्याची काळजी घेणे आवश्यक. |
| कुंभ | नोकरीसाठीअधिक परिश्रम घ्यावे लागतील. आर्थिक व्यवहार करताना खबरदारी आवश्यक. रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. |
| मीन | सरकारी क्षेत्रात कामे करताना अडचणी उद्भवू शकतात. नोकरीच्या स्वरूपात बदल होऊ शकतो. संततीशी सुसंवाद साधा. |

## निकाल — गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 31 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 04/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-08 : 1474**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0105 | 4949 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | 7424 | 8788 | 9642 | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0324 | 2021 | 3734 | 4209 | 5159 | 5166 | 5628 | 7992 | 8842 | 8884 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0102 | 0894 | 0904 | 3235 | 4108 | 4119 | 4326 | 5666 | 6311 | 6616 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0004 | 0519 | 1178 | 2494 | 3367 | 4854 | 5734 | 7362 | 8087 | 9093 |
| 0009 | 0546 | 1184 | 2602 | 3386 | 4924 | 5779 | 7372 | 8180 | 9219 |
| 0044 | 0585 | 1192 | 2622 | 3416 | 4998 | 5871 | 7375 | 8255 | 9323 |
| 0048 | 0798 | 1197 | 2630 | 3430 | 5050 | 5920 | 7397 | 8340 | 9559 |
| 0080 | 0815 | 1288 | 2752 | 3532 | 5104 | 6041 | 7477 | 8384 | 9723 |
| 0109 | 0970 | 1341 | 2794 | 3578 | 5250 | 6669 | 7512 | 8387 | 9764 |
| 0120 | 0975 | 1462 | 2823 | 3587 | 5279 | 6701 | 7614 | 8453 | 9809 |
| 0136 | 0988 | 1536 | 2921 | 3813 | 5296 | 6761 | 7637 | 8649 | 9900 |
| 0167 | 1100 | 1700 | 3033 | 4004 | 5401 | 6762 | 7709 | 8807 | 9946 |
| 0175 | 1104 | 2022 | 3267 | 4124 | 5415 | 6776 | 7814 | 8819 | 9950 |
| 0300 | 1117 | 2209 | 3318 | 4448 | 5423 | 6796 | 7872 | 8842 | 9973 |
| 0320 | 1126 | 2251 | 3343 | 4576 | 5510 | 6799 | 7894 | 9007 | 9977 |
| 0371 | 1132 | 2432 | 3347 | 4715 | 5522 | 6946 | 7909 | 9029 | 9989 |
| 0453 | 1177 | 2452 | 3351 | 4725 | 5535 | 7310 | 7912 | 9038 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 31 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 04/08/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-01 : 9356**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1587 | 2085 | 2110 | 3216 | 5254 | 5388 | 6694 | 6751 | 8565 | 8655 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0264 | 1250 | 2051 | 3649 | 4186 | 6787 | 6882 | 8083 | 8410 | 9298 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1441 | 1452 | 2702 | 3580 | 4572 | 5764 | 5987 | 7039 | 8929 | 9970 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 300/- | 0759 | 1998 | 2936 | 3956 | 5154 | 6316 | 6979 | 7601 | 8462 | 9234 |
| 0009 | 0769 | 2011 | 3020 | 4009 | 5298 | 6346 | 6999 | 7695 | 8482 | 9249 |
| 0014 | 0782 | 2014 | 3082 | 4135 | 5362 | 6362 | 7034 | 7732 | 8486 | 9309 |
| 0047 | 0999 | 2052 | 3083 | 4224 | 5412 | 6375 | 7126 | 7745 | 8667 | 9315 |
| 0048 | 1016 | 2070 | 3150 | 4245 | 5435 | 6405 | 7131 | 7764 | 8688 | 9369 |
| 0051 | 1020 | 2226 | 3238 | 4248 | 5457 | 6471 | 7251 | 7790 | 8705 | 9394 |
| 0076 | 1026 | 2232 | 3244 | 4263 | 5493 | 6498 | 7281 | 7792 | 8772 | 9403 |
| 0078 | 1100 | 2246 | 3302 | 4424 | 5502 | 6546 | 7289 | 7901 | 8800 | 9421 |
| 0204 | 1135 | 2250 | 3305 | 4434 | 5511 | 6629 | 7304 | 7945 | 8815 | 9428 |
| 0280 | 1215 | 2265 | 3322 | 4444 | 5530 | 6633 | 7333 | 7971 | 8819 | 9477 |
| 0287 | 1287 | 2391 | 3332 | 4448 | 5565 | 6645 | 7370 | 7975 | 8830 | 9489 |
| 0419 | 1351 | 2411 | 3335 | 4462 | 5624 | 6662 | 7393 | 7991 | 8841 | 9671 |
| 0440 | 1413 | 2420 | 3389 | 4524 | 5755 | 6676 | 7407 | 8054 | 8848 | 9689 |
| 0452 | 1429 | 2443 | 3551 | 4764 | 5801 | 6731 | 7428 | 8116 | 8944 | 9759 |
| 0501 | 1512 | 2526 | 3613 | 4814 | 5814 | 6836 | 7442 | 8136 | 8963 | 9764 |
| 0508 | 1612 | 2533 | 3623 | 4864 | 6133 | 6860 | 7470 | 8138 | 8983 | 9795 |
| 0604 | 1638 | 2569 | 3662 | 5014 | 6176 | 6875 | 7472 | 8184 | 9079 | 9870 |
| 0605 | 1717 | 2688 | 3777 | 5039 | 6252 | 6876 | 7484 | 8219 | 9088 | 9935 |
| 0632 | 1722 | 2699 | 3833 | 5040 | 6259 | 6890 | 7498 | 8344 | 9089 | 9961 |
| 0642 | 1751 | 2720 | 3930 | 5044 | 6310 | 6896 | 7501 | 8411 | 9118 | 9974 |
| 0711 | 1910 | 2742 | 3943 | 5135 | 6314 | 6963 | 7590 | 8441 | 9229 | 9978 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. ५/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| २ | १ | ६ |
| २१ | १२ | ६२ |
| २६ | १७ | ६७ |
| १३८ | १२८ | १२३ |
| २३७ | ३८० | ३६७ |

# आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ७.०८ लाख कोटींची करचोरी

■ नवी दिल्ली

वस्तू व सेवा कर अर्थात जीएसटी च्या देशभरातील प्रादेशिक अधिकाऱ्यांनी गेल्या पाच वर्षात केलेल्या कारवाईत ७.०८ लाख कोटी रुपयांच्या जीएसटी चोरीची प्रकरणे उघडकीस आली आहेत. केंद्रीय वित्तराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी आज लोकसभेत ही माहिती दिली. चौधरींनी एका लेखी उत्तरात म्हटले की, २०२४-२५ या वित्तवर्षात २.२३ लाख कोटी रुपयांहून अधिक वस्तू व सेवा कराची चोरी झाली आहे. या वर्षात एकूण ३० हजार ५६ प्रकरणे उघडकीस आली. त्यातील सर्वाधिक १५ हजार २८३ प्रकरणे आयएसडीच्या फसवणुकीच्या संदर्भात आहेत. यामध्ये ५८ हजार ७७२ कोटी रुपयांची करचोरी झाली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात २.३० लाख कोटी रुपयांच्या जीएसटी चोरीची प्रकरणे समोर आली असून यात ३६ हजार ३७४ कोटी रुपयांची करचोरी झाली. आर्थिक वर्ष २१ पासून ते २०२५ पर्यंत ४४ हजार ९३८ प्रकरणांमध्ये १.७९ कोटी रुपयांची आईटीसी फसवणूक झाली.

# मेघना बोर्डीकर पुन्हा बरळल्या अंधारेंकडून व्हिडिओ शेअर

■ मुंबई

राज्यमंत्री व भाजपा नेत्या मेघना बोर्डीकर यांनी पुन्हा वादग्रस्त वक्तव्य केले. या वक्तव्याचा व्हिडिओ उबाठा नेत्या सुषमा अंधारे यांनी एक्सवर शेअर केला. या व्हिडिओमध्ये बोर्डीकर उपस्थितांना उद्देशून म्हणतात की, कुणाच्या घरी गोड बातमी असेल, तीसुद्धा आमच्याचमुळे असेही काही लोक म्हणतील. यावर अंधारे यांनी टोला लगावत म्हटले की, मेघना बोर्डीकरांचा बेताल वक्तव्यांचा भडीमार सुरू आहे. बोर्डीकरांच्या वादग्रस्त वक्तव्यांचा सिलसिला बघता त्या संजय शिरसाट यांची बहीण शोभून दिसतात. काही दिवसांपूर्वी मंत्री बोर्डीकर यांचा एका ग्रामसेवकाला धमकावल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यानंतर त्या पुन्हा बरळल्या आहेत.

# भांडुपमध्ये झोपडीधारकांना संरक्षण भिंतीची प्रतीक्षा

■ मुंबई

**भांडुपमध्ये** दरड्यांवर वास्तव्य करणाऱ्या झोपडपट्टीवासीयांना संरक्षण भिंतीची प्रतीक्षा आहे. महापालिका संबंधित शासनाची यंत्रणा कानाडोळा करत आहे,असा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. गेल्या पंधरा दिवसांपूर्वी भांडुप खिंडीपाडा येथे दरड कोसळून जवळपास सात घरांचे नुकसान झाले होते. असे स्थानिक पुढे म्हणाले, खिंडीपाडा, गांवदेवी श्रीरामनगर, नरदास नगर, हनुमान टेकडी, सोलापूर दर्गा, अशोक टेकडी या डोंगराळ भागात हजारो झोपडपट्ट्या आहेत. यापूर्वी काही ठिकाणी दरड कोसळण्याच्या घटना घडलेल्या आहेत. पावसाळा उंबरठ्यावर आला की, पालिका सुरक्षितस्थळी जा. अशा नोटीसा देते. पण कायमस्वरुपी आमचे पुनर्वसन केले जावे. यावर तोडगा काढला जात नाही. दरवर्षीच्या पावसाळ्यात दरड कोसळण्याची टांगती तलवार घरांवर लटकत असते. आमचे योग्य जागी पुनर्वसन व्हावे. अन्यथा मजबूत अशी संरक्षण भिंती बांधून देण्यात याव्यात, एवढीच अपेक्षा आहे.

## महाराष्ट्र सागरलक्ष्मी विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत दर सोमवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 31 • सोडत दिनांक 04/08/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 8 लाख — **SL-03 : 3049**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **5479** (डायमंड कॉर्पोरेशन - बोरिवली; ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई)

| बक्षिस | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1466 | 1927 | 3797 | 3878 | 5298 | 5431 | 6550 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 3001 | 3520 | 3866 | 4127 | 4312 | 4470 | 6396 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2283 | 3252 | 4279 | 5060 | 5767 | 6051 | 6639 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1955 | 2998 | 3235 | 3860 | 4108 | 5273 | 5597 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1734 | 2231 | 2677 | 3352 | 4024 | 4611 | 5134 | 5551 | 6076 | 6468 | 6914 | 7515 |
| | | 1739 | 2240 | 2705 | 3354 | 4046 | 4614 | 5137 | 5559 | 6082 | 6487 | 6944 | 7522 |
| | | 1741 | 2243 | 2716 | 3380 | 4083 | 4642 | 5152 | 5562 | 6119 | 6546 | 6945 | 7523 |
| 1005 | 1393 | 1784 | 2250 | 2750 | 3393 | 4134 | 4644 | 5155 | 5564 | 6123 | 6589 | 6948 | 7526 |
| 1039 | 1411 | 1790 | 2255 | 2757 | 3395 | 4140 | 4648 | 5156 | 5568 | 6125 | 6596 | 6971 | 7536 |
| 1050 | 1414 | 1815 | 2259 | 2763 | 3398 | 4239 | 4664 | 5187 | 5584 | 6136 | 6598 | 6981 | 7545 |
| 1076 | 1455 | 1816 | 2266 | 2782 | 3402 | 4240 | 4685 | 5216 | 5602 | 6161 | 6600 | 7007 | 7551 |
| 1081 | 1489 | 1818 | 2273 | 2794 | 3410 | 4241 | 4694 | 5246 | 5624 | 6163 | 6621 | 7011 | 7609 |
| 1082 | 1505 | 1829 | 2274 | 2841 | 3414 | 4277 | 4718 | 5252 | 5625 | 6166 | 6625 | 7025 | 7626 |
| 1097 | 1511 | 1861 | 2275 | 2847 | 3416 | 4294 | 4724 | 5270 | 5649 | 6168 | 6631 | 7046 | 7669 |
| 1114 | 1512 | 1869 | 2278 | 2890 | 3453 | 4298 | 4730 | 5273 | 5665 | 6169 | 6639 | 7057 | 7671 |
| 1115 | 1514 | 1875 | 2281 | 2892 | 3459 | 4303 | 4740 | 5277 | 5666 | 6185 | 6641 | 7068 | 7697 |
| 1116 | 1515 | 1879 | 2282 | 2958 | 3471 | 4306 | 4744 | 5300 | 5676 | 6188 | 6645 | 7077 | 7726 |
| 1118 | 1524 | 1897 | 2283 | 2972 | 3517 | 4322 | 4752 | 5301 | 5691 | 6217 | 6646 | 7078 | 7727 |
| 1120 | 1531 | 1911 | 2287 | 3002 | 3528 | 4344 | 4803 | 5322 | 5699 | 6235 | 6649 | 7080 | 7737 |
| 1127 | 1541 | 1913 | 2297 | 3043 | 3533 | 4347 | 4835 | 5347 | 5715 | 6260 | 6654 | 7081 | 7742 |
| 1128 | 1553 | 1918 | 2320 | 3052 | 3535 | 4364 | 4840 | 5354 | 5752 | 6266 | 6656 | 7108 | 7743 |
| 1129 | 1580 | 1919 | 2339 | 3063 | 3544 | 4371 | 4845 | 5357 | 5757 | 6267 | 6657 | 7122 | 7746 |
| 1131 | 1585 | 1921 | 2355 | 3101 | 3630 | 4400 | 4852 | 5358 | 5764 | 6279 | 6669 | 7127 | 7748 |
| 1141 | 1588 | 1952 | 2371 | 3104 | 3653 | 4401 | 4874 | 5364 | 5787 | 6299 | 6671 | 7138 | 7755 |
| 1174 | 1601 | 1966 | 2402 | 3120 | 3673 | 4405 | 4890 | 5375 | 5795 | 6304 | 6673 | 7141 | 7767 |
| 1187 | 1602 | 1972 | 2415 | 3133 | 3674 | 4414 | 4908 | 5384 | 5800 | 6315 | 6682 | 7146 | 7780 |
| 1196 | 1607 | 1977 | 2427 | 3135 | 3707 | 4416 | 4924 | 5401 | 5814 | 6331 | 6690 | 7147 | 7784 |
| 1199 | 1611 | 2022 | 2431 | 3136 | 3721 | 4433 | 4925 | 5415 | 5818 | 6333 | 6701 | 7197 | 7799 |
| 1215 | 1631 | 2023 | 2440 | 3138 | 3731 | 4434 | 4929 | 5418 | 5825 | 6354 | 6727 | 7198 | 7805 |
| 1243 | 1654 | 2034 | 2443 | 3139 | 3732 | 4439 | 4934 | 5422 | 5835 | 6377 | 6749 | 7208 | 7832 |
| 1245 | 1657 | 2048 | 2452 | 3180 | 3753 | 4443 | 4941 | 5430 | 5845 | 6389 | 6760 | 7230 | 7847 |
| 1270 | 1659 | 2051 | 2467 | 3191 | 3767 | 4449 | 4944 | 5449 | 5854 | 6391 | 6762 | 7281 | 7865 |
| 1271 | 1668 | 2055 | 2482 | 3238 | 3771 | 4451 | 4946 | 5454 | 5895 | 6396 | 6787 | 7344 | 7870 |
| 1298 | 1675 | 2062 | 2489 | 3239 | 3798 | 4453 | 4962 | 5458 | 5904 | 6407 | 6800 | 7346 | 7872 |
| 1299 | 1684 | 2086 | 2523 | 3274 | 3824 | 4457 | 4972 | 5465 | 5933 | 6408 | 6819 | 7349 | 7876 |
| 1304 | 1690 | 2102 | 2557 | 3283 | 3866 | 4464 | 4984 | 5473 | 5936 | 6412 | 6833 | 7352 | 7877 |
| 1321 | 1701 | 2112 | 2568 | 3308 | 3903 | 4469 | 4994 | 5501 | 5955 | 6418 | 6834 | 7361 | 7892 |
| 1331 | 1704 | 2117 | 2582 | 3310 | 3908 | 4470 | 5025 | 5510 | 6001 | 6437 | 6866 | 7373 | 7906 |
| 1341 | 1712 | 2120 | 2584 | 3311 | 3937 | 4501 | 5054 | 5513 | 6006 | 6442 | 6867 | 7374 | 7927 |
| 1359 | 1718 | 2162 | 2612 | 3319 | 3943 | 4514 | 5078 | 5519 | 6021 | 6446 | 6869 | 7393 | 7931 |
| 1361 | 1719 | 2201 | 2631 | 3322 | 3988 | 4540 | 5084 | 5532 | 6045 | 6448 | 6878 | 7474 | 7971 |
| 1365 | 1727 | 2216 | 2639 | 3323 | 3990 | 4549 | 5085 | 5543 | 6053 | 6458 | 6887 | 7481 | 7987 |
| 1372 | 1728 | 2227 | 2672 | 3346 | 3993 | 4600 | 5116 | 5550 | 6063 | 6460 | 6889 | 7505 | 7989 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## — — लॉटरी — —

## निकाल — महाराष्ट्र सह्याद्री • धनलक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता

महाराष्ट्र राज्य लॉटरी

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 31 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 04/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SL-06 : 5927**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 1227 | 1432 | 2237 | 3541 | 3628 | 4172 | 4361 | 4468 | 4658 | 5504 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 1244 | 1408 | 2151 | 2481 | 2744 | 4370 | 4480 | 4836 | 5015 | 5341 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1068 | 2230 | 3393 | 4324 | 4888 |
| 1138 | 2241 | 3592 | 4379 | 4894 |
| 1238 | 2247 | 3614 | 4465 | 5155 |
| 1343 | 2262 | 3630 | 4496 | 5258 |
| 1461 | 2282 | 3689 | 4536 | 5266 |
| 1687 | 2297 | 3692 | 4574 | 5420 |
| 1809 | 2498 | 3731 | 4607 | 5452 |
| 1891 | 2686 | 3856 | 4649 | 5461 |
| 1910 | 2854 | 3860 | 4688 | 5465 |
| 2072 | 3082 | 4064 | 4748 | 5493 |
| 2111 | 3206 | 4207 | 4751 | 5727 |
| 2135 | 3378 | 4294 | 4797 | 5832 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# २०13 केदारनाथ दुर्घटनेतील सांगाड्यांचा शोध पुन्हा सुरू

■ रुद्रप्रयाग



२०१३ मध्ये केदारनाथ येथे झालेल्या जलप्रलय दुर्घटनेत ३ हजार ७५ लोक बेपत्ता झाले होते. त्यापैकी अनेकांचा आजही तपास लागलेला नाही. यासंदर्भात उत्तराखंड उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेनुसार, सरकारला या सांगाड्यांचा शोध घेऊन सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार करण्याचे निर्देश दिले आहेत. यानुसार आतापर्यंत सरकारने चार वेळा शोधपथके पाठवली होती. या शोधमोहिमेदरम्यान २०१४ मध्ये २१, २०१६ मध्ये ९ आणि २०२० मध्ये चट्टी व गौमुखी परिसरात ७०३ सांगाडे सापडले होते. या सांगाड्यांची डीएनए चाचणी करून नातेवाईकांचा शोध घेण्याचा प्रयत्न झाला. परंतु अद्याप ७०२ मृतांची ओळख पटलेली नाही. या मृतांचे डीएनए नमुने पोलिसांकडे आहेत. या घटनेशी संबंधित मृतांच्या सुमारे ६ हजार नातेवाईकांनी डीएनए नमुने दिले होते. परंतु त्यामध्ये ७०२ नमुने जुळलेले नाहीत. नोव्हेंबर २०२४ मध्ये पाठवलेली १० पथके शोधमोहिमेत अपयशी ठरली होती. आपत्ती व्यवस्थापन सचिव विनोद कुमार सुमन यांनी माहिती दिली की, यावर्षी पुन्हा एकदा शोधपथके विविध ट्रेकिंग मार्गांवर पाठवली जाणार आहेत. संबंधित अहवाल लवकरच न्यायालयात सादर केला जाणार आहे.

देश विदेश

# इराणला अणूऊर्जा विकसित करण्यास पाकिस्तानचा पाठिंबा

■ इस्लामाबाद

**शांततेच्या** कारणास्तव अणूऊर्जा क्षमता विकसित करण्याच्या इराणच्या अधिकाराला पाकिस्तानने पाठिंबा दिला. दोन्ही देशांमध्ये व्यापाऱ्यासह विविध क्षेत्रांमधील सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी काही करारांवर आज स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. पाकिस्तानच्या दौऱ्यावर आलेले इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली.

## शरीफ यांची भूमिका

दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या बैठकीनंतर एका संयुक्त पत्रकार परिषदेत शरीफ यांनी इराणला शांततामय मार्गाने अणूऊर्जा विकसित करण्याचा अधिकार असल्याच्या मुद्यावर भर दिला. इराणला शांततेच्या मार्गाने अणू उर्जा मिळवण्याचा अधिकार आहे, असे शरीफ म्हणाले.

# नेपाळमध्ये नदीत बुडालेल्या भारतीयाचा मृतदेह सापडला

■ काठमांडू

**नेपाळमधील** बागमती नदीत बुडून भारतीय व्यक्तीचा मृत्यू झाला. तराई पठाराच्या दक्षिणेकडील जलसिंचन प्रकल्पाच्या कालव्यात दुसऱ्या दिवशी या व्यक्तीचा मृतदेह आढळला. रोहित कुमार सिंह असे या व्यक्तीचे नाव असून, तो मूळचा बिहारमधील खागरिया जिल्ह्यातील रहिवासी होता. काल दुपारी तो मद्यसेवन केलेल्या अवस्थेमध्ये बागमती नदीमध्ये अंघोळीला उतरला होता. मात्र थोड्याच वेळात तो बेपत्ता झाला होता. नेपाळच्या सशस्त्र पोलीस दल आणि आपत्ती विभागाच्या संयुक्त बचाव पथकाला सिंह यांचा मृतदेह रविवारी सकाळी गुजरा महापालिकेच्या हद्दीत बागमती जलसिंचन कालव्यामध्ये सापडला, असे रोहूहात पोलीस उपअधीक्षक जीपक कुमार राय यांनी सांगितले.

# मुस्लीम मुख्याध्यापक नको शाळेतील टाकीत विष टाकले

■ बंगळुरू

## श्रीराम सेनेचा तालुकाध्यक्ष अटकेत

**मुस्लीम** मुख्याध्यापकाला हटवण्यासाठी शाळेच्या पाण्याच्या टाकीत विषारी रसायन टाकल्याचा धक्कादायक प्रकार कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यात घडला आहे. या प्रकरणी श्रीराम सेनेचा तालुका अध्यक्ष सागर पाटील याच्यासह नागनगौडा पाटील व कृष्णा मदार यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकारामुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

गेल्या १३ वर्षांपासून हुलीकट्टी परिसरातील सरकारी शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या सुलेमान गोरीनाईक यांच्यावरील वैयक्तिक रागातून आणि त्यांची प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने शाळेतील पाण्याच्या टाकीत विषारी द्रव्य मिसळण्याचा भयंकर प्रकार करण्यात आला. त्यामुळे १२ विद्यार्थी आजारी पडले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सध्या सर्वांची प्रकृती स्थिर आहे. मात्र या घटनेने शाळा प्रशासन आणि पालकवर्गात भीती व चिंता पसरली आहे. हे कृत्य करण्यासाठी आरोपींनी एका पाचवीच्या विद्यार्थ्याचा वापर केल्याची बाब उघड झाली आहे.

# शिक्षणाने हुकुमशाहीच्या बेड्या तोडता येतील! कमल हसन यांचे विधान

■ चेन्नई

**शिक्षण** हे एक हत्यार असून, त्यामुळेच हुकुमशाही व सनातन विचारधारेच्या बेड्या तोडता येतील, असे ज्येष्ठ अभिनेते व मक्कल निधी मय्यम पक्षाचे प्रमुख कमल हसन यांनी म्हटले आहे. एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी उपस्थितांसमोर शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना सनातन धर्माच्या विचारधारेवरही प्रहार केला.

कमल हसन म्हणाले की, इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा आपण शिक्षणाला महत्त्व दिले पाहिजे. याशिवाय आपण विजयी होऊ शकणार नाही. नीट परीक्षेने २०१७ पासून अनेक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणापासून वंचित ठेवले आहे. गरीब व वंचित घटकातील विद्यार्थी इच्छा असूनही शिक्षण घेऊ शकत नाहीत. शिक्षण हे एक हत्यार व साधन असून त्यामुळेच देशाला नव्याने आकार दिला जाऊ शकतो. जनता शिक्षित असेल तरच ती चांगल्या व वाईटामध्ये भेद करू शकते.

# परिषदेत तुर्की, अझरबैजानच्या समावेशावर भारताचा आक्षेप

■ बीजिंग



**चीनच्या** तियानजिनमध्ये सप्टेंबरच्या प्रारंभी होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) परिषदेत पाकिस्तानचे सहकारी तुर्की आणि अझरबैजानला सामील करण्यावरून भारताने आक्षेप नोंदविला. या परिषदेत जगभरातील २० देशांचे प्रमुख सामील होणार असून, रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीही तियानजिनचा दौरा करू शकतात. परंतु दहशतवादाचे समर्थन करणाऱ्या तुर्की आणि अझरबैजानच्या उपस्थितीमुळे एससीओच्या उद्देशांना धक्का पोहोचू शकतो, असे भारताने परिषदेपूर्वी स्पष्ट केले.

याबाबत भारत आणि चीनमध्ये चर्चा सुरू असून, पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर तुर्की आणि अझरबैजानने पाकिस्तानची पाठराखण केली होती. सर्व मुस्लीम देशांनी दहशतवादी हल्ल्याची निंदा केली, तर तुर्की आणि अझरबैजानने पाकिस्तानला उघड साथ दिली होती. ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतावर पाकिस्तान हा तुर्कियेकडून प्राप्त ड्रोनचा वापर करत होता. तर अझरबैजान पाकिस्तानला राजकीय स्वरुपात पूर्ण साथ देत होता. मागील महिन्यात विदेशमंत्री एस. जयशंकर हे चीन दौऱ्यावर गेले होते, तेव्हा त्यांनी एससीओ बैठकीदरम्यान दहशतवादाचे समर्थन करणाऱ्या देशांना बाजूला करावे लागणार असल्याचे स्पष्ट केले होते.



**गणेश उत्सवाला अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने गणेश भक्तांची जोरदार लगबग सुरू आहे. त्यानिमित्त गणेश भक्तांनी वाजतगाजत आपल्या लाडक्या सुंदरबागच्या राजाची मूर्ती मंडपात नेली.**

# उबाठा सुवर्णकार सेनेकडून खा. सावंत यांचा सत्कार

■ मुंबई



**दक्षिण** मुंबईचे खासदार अरविंद सावंत यांना नुकताच २०२५ चा संसदरत्न पुरस्कार मिळाला आहे. त्यांनी सलग तीन वेळा दक्षिण मुंबईतून लोकसभेवर निवडून येत लोकप्रतिनिधी म्हणून नेतृत्व सिद्ध केले आहे. त्यानिमित्ताने उबाठा सुवर्णकार सेनेच्या पदाधिकाऱ्यांकडून भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी दक्षिण मुंबईचे विभागप्रमुख संतोष शिंदे, माजी नगरसेविका मिनल जुवाटकर, शाखाप्रमुख बाळा अहिरेकर, सुवर्णकार सेनेचे अध्यक्ष प्रवीण जुवाटकर, माजी आमदार अशोक धात्रक, उपाध्यक्ष दिवाकर भटकर, राजेश नारकर, मिताली शहा यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पालिकेचे मलबार हिल कॅफे चालविण्यास कुणीच राजी नाही

■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिकेचा मलबार हिल येथील नाझ कॅफे बंद झाल्यानंतर त्याच जागी उभारलेल्या गॅलरीत कॅफे चालविण्यास कोणीही पुढे आलेले नाही. कॅफे चालवण्यासाठीची ११ कोटींची रक्कम व पालिकेच्या जाचक अटींमुळेच कोणी पुढे येत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

मलबार हिल इथे नाझ कॅफे बंद झाल्यावर तिथे विकास करून दोन मजली प्रमोद नवलकर गॅलरी बांधण्यात आली. यात ५ हजार चौरस फूट जागेतील व्ह्यूईंग गॅलरीत पुन्हा कॅफे सुरू करण्यासाठी १० वर्षाला ११.७२ कोटी रुपये भाडे ठरवले गेले. मात्र हे भाडे जास्त असल्याचे म्हणत अनेक कंत्राटदारांनी त्याच्याकडे पाठ फिरवली आहे. भाडे तर जास्त आहेच पण या कॅफेत जेवण वा पदार्थ तयार करण्यास प्रतिबंध असून, केवळ चहा कॉफी व तयार पदार्थ विकण्याचीही अट आहे. केवळ भाडेच नव्हे तर या अटीमुळेही अनेक जण ही जागा भाड्याने घेण्यासाठी इच्छुक नसल्याचे आहार संघटनेचे अध्यक्ष सुधाकर शेट्टी यांनी म्हटले आहे.

# मुंबई-नांदेड वंदे भारत २६ ऑगस्टपासून धावणार

■ मुंबई

**मुंबई** ते जालना दरम्यान धावणाऱ्या वंदे भारत एक्स्प्रेसचा आता नांदेडपर्यंत विस्तार करण्यात आला आहे. ही ट्रेन २६ ऑगस्टपासून धावणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथून ही गाडी दुपारी १.१० वाजता सुटेल आणि रात्री १०.५० वाजता नांदेडला पोहोचेल. परतीच्या प्रवासात गाडी नांदेडहून सकाळी ५ वाजता निघणार आहे.

ती सीएसएमटी, दादर, ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, औरंगाबाद, जालना, परभणी आणि नांदेड अशा १० स्थानकांवर थांबणार आहे. या मार्गावरील एसी चेअर कारचे तिकीट १,७५० रुपये, तर एक्झिक्युटिव्ह एसी चेअर कारचे तिकीट ३,३०० रुपये इतके आहे.

# हातखंब्यात पुन्हा एलपीजी टँकरचा अपघात! १ जखमी

■ रत्नागिरी



**मुंबई-गोवा** महामार्गावर रत्नागिरी तालुक्यातल्या हातखंबा गावात आज सकाळी एलपीजी टँकरचा अपघात झाला. नियंत्रण सुटल्यामुळे हा टँकर रस्त्यावरून खाली येऊन येथील शाळेजवळच्या एका टपरीत घुसला. टँकरने दोन-तीन दुचाकींना धडक दिली असली तरी या अपघातात केवळ टँकरचा चालक जखमी झाला आहे. हा अपघात शाळेजवळ झाल्याने ग्रामस्थ संतप्त झालेत. त्यांनी काही काळ मुंबई-गोवा महामार्ग रोखून धरला. सुदैवाने शाळेची मुले बाहेर असल्यामुळे मोठी दुर्घटना टळली. महामार्ग चौपदरीकरण कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे हे अपघात घडत असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे. ज्वलनशील पदार्थ वाहून नेणाऱ्या टँकरच्या वारंवार घडणाऱ्या अपघाताबद्दलही ग्रामस्थांनी चिंता व्यक्त केली आहे. पोलिसांनी संतप्त ग्रामस्थांबरोबर चर्चा केल्यानंतर ग्रामस्थांनी हा रस्ता पुन्हा खुला केला. या संदर्भात पोलीस अधीक्षक कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली आहे. निवळी गावातही एक टँकर उलटून अपघात झाला होता. गेल्या आठवड्यातच हातखंबा गावात टँकर उलटून झालेल्या वायुगळतीमुळे महामार्ग १५ तास बंद करावा लागला होता.

# लातूरमध्ये नागरिकांची सतर्कता दरोडेखोरांची टोळी गजाआड

■ लातूर

**लातूर** जिल्ह्याच्या औसा तालुक्यातील औसा-तुळजापूर या राष्ट्रीय महामार्गावर नागरिकांच्या सतर्कतेने व पोलिसांच्या दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या टोळीला जेरबंद करण्यात आले.

औसा-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील शिंदाळा गावाजवळ काल रात्री एक वाहन संशयास्पदरित्या फिरत होते. यावेळी तेथील सतर्क नागरिकांनी हे वाहन अडवून त्याची तपासणी केली असता या वाहनात आठ जण हत्यारासह आढळले. नागरिकांनी तत्काळ औसा आणि भादा पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी तत्परता दाखवत आठपैकी पाच जणांना ताब्यात घेतले. आरोपींकडून एकूण ७ लाख ७१ हजारांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला. आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे.

# बेळगावच्या १२ मठाधिपतींचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

■ ठाणे



**महाराष्ट्र - कर्नाटक** सीमेवरील बेळगाव जिल्ह्यातील १२ मठाधिपतींनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. ठाण्यातील आनंद आश्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

दत्त गगनगिरी ध्यानमंदिराचे प्रमुख प.पू. पुरुषोत्तम माळी महाराज यांच्या नेतृत्वात सागर बागडी, नूतन धनावडे, बाळकृष्ण कांबळे, सुवेल शेट्टे, मयूर गुरव, साई पाटील, अनिकेत वरके, सुषमा खरात, दीपा फडणवीस, अरविंद शिरळाकर, दादा महाराज आणि अजय घराडे यांनी शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेतला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मागील तीन वर्षांपासून शिवसेनेकडे लोकांचा ओढा वाढत आहे. हिंदुत्व आणि विकास या दोन पायांवर आमचा प्रवास सुरू आहे. साधुसंतांच्या आशिर्वादानेच हे काम शक्य होत आहे.

# कोल्हापूर पालिकेत भ्रष्टाचार ठाकरे गटाचा पालिकेला घेराव


■ कोल्हापूर

**कोल्हापूर** महानगरपालिकेत होत असलेल्या भ्रष्टाचाराला अधिकारी पाठीशी घालत असल्याचा आरोप करत आज शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पालिकेला घेराव घातला.

ठाकरे गटाचे कोल्हापूर जिल्हाप्रमुख रविकिरण इंगवले यांच्या नेतृत्वाखाली मनपा इमारतीला दुचाकी व रिक्षांच्या सहाय्याने घेराव घालण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ यांना निवेदन देण्यात आले. त्यात म्हटले की, शहरात १०० कोटींचे रस्ते धूळ खात पडले आहेत. शहरातील अधिकारी व लोकप्रतिनीधींनी मिळून ८५ लाखांचा भ्रष्टाचार केला असून, या अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे. कोल्हापूरच्या जनतेला जाग येण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आल्याचे रविकिरण इंगवले यांनी म्हटले.

# मुंबईतील मदनपुरामध्ये जुनी इमारत कोसळली

■ मुंबई



**मुंबईच्या** मदनपुरा परिसरात नूर मंजिल ही दोन मजली इमारत आज अचानक कोसळली. त्यावेळी परिसरात मोठा आवाज झाला आणि धुरळा उडाल्याने क्षणभर भीतीचे वातावरण निर्माण झाले. इमारतीचा बराचसा भाग रस्त्यावर पडल्यामुळे काही वेळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

ही इमारत धोकादायक असल्याने महापालिकेने यापूर्वीच तिला नोटीस बजावली होती. त्यामुळे या इमारतीत कोणीही राहत नव्हते. त्यामुळे या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि ढिगारा हटवण्यास सुरुवात केली.

# पाणीटंचाई, खड्डे प्रश्नावर नाशकात मनसेचा हंडा मोर्चा

■ नाशिक



**नाशिक** शहरातील पाणीटंचाई आणि रस्त्यांवरील खड्ड्यांच्या प्रश्नावर मनसेने आज महापालिका कार्यालयावर हंडा मोर्चा काढला. महिलांनी डोक्यावर हंडे घेऊन पालिकेच्या प्रवेशद्वारावर आंदोलन करत प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली. यावेळी पालिकेचा धिक्कार असो, असे फलक आंदोलकांनी झळकावले.

आंदोलकांनी सांगितले की, शहरातील धरणे भरली आहेत. मात्र अनेक भागांमध्ये नळाला पाणी नाही. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिकांचे हाल सुरू आहेत. खड्डे म्हणजे भ्रष्टाचाराचे अड्डे झाले आहेत. पालिकेला अनेकदा निवेदन देऊनही महापालिकेकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. पालिका प्रशासनाने जर तत्काळ खड्डे बुजवले नाहीत आणि पाणीपुरवठा सुरळीत केला नाही तर मनसे कार्यकर्ते अधिकाऱ्यांना रस्त्यावरच तुडवणार. त्याचबरोबर तीव्र आंदोलन छेडले जाईल. यावेळी आंदोलनस्थळी पोलीस बंदोबस्त तैनात होता.

# हरियाणातील पंचकुलात स्फोट! जीवितहानी नाही

■ चंदीगढ

**हरियाणातील** पंचकुला येथील कालका विभागात एका फास्टफूड रेस्टॉरंटमध्ये आज सकाळी शक्तिशाली स्फोट झाला. मात्र, हे हॉटेल बंद असल्याने यात जीवितहानी झाली नाही.

पंचकुला येथील एका हॉटेलमध्ये आज सकाळी ९ वाजता हा स्फोट झाला. यावेळी दुकानाबाहेर पार्क केलेल्या दोन गाड्या दुकानाच्या ढिगाऱ्याखाली सापडल्या. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की, दुकान जमीनदोस्त झाले. पोलीस व स्फोट तज्ज्ञांनी संपूर्ण परिसर सील केला. दुकानातील सिलिंडर व इनव्हर्टर शाबूत असल्याने स्फोट नेमका कशामुळे झाला याचा शोध घेतला जात आहे. पोलीस दुकानाच्या मालकाची चौकशी करत आहेत.

# सागरेश्वर अभयारण्याच्या सौंदर्याची पर्यटकांना भुरळ

■ सांगली

**सह्याद्रीच्या** कुशीत वसलेले स्व. यशवंतराव चव्हाण सागरेश्वर अभयारण्याच्या निसर्ग सौंदर्याची पर्यटकांना भुरळ पडली आहे. आकाशातून सतत कोसळणाऱ्या पावसाच्या सरींमुळे परिसराने हिरवा शालू परिधान केल्याचे नयनरम्य दृश्य पर्यटकांचे स्वागत करत असल्याची अनुभूती येते.

अभयारण्यात फिरणारे हरिण, काळविटांचे कळप आणि रंगीबेरंगी पक्ष्यांचे थवे पर्यटकांचे लक्ष वेधून घेतात. हरणांचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध असलेले सागरेश्वर अभयारण्य पुन्हा एकदा पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले. अभयारण्यात प्रवेश करताच विरंगुळ्यासाठी सुंदर बगीचा आहे. तेथून पुढे गेल्यावर छत्री बंगला हे लोकप्रिय स्थळ आहे. या ठिकाणी वाहणाऱ्या पाण्याच्या धारा आणि बागडणाऱ्या हरणांचे दृश्य पर्यटकांना मंत्रमुग्ध करते. याच परिसरात प्रभू श्रीरामांचे प्राचीन व शांतीदायक मंदिर आहे. अनेक रामभक्त येथे नामस्मरण करत असतात. याशिवाय येथील झेड आकाराच्या घाटाला झेड पॉईंट म्हणून ओळखले जाते. घाट चढून वर गेल्यावर फेटा उडवी पॉईंटवरून विहंगम दृश्य दिसते. या अभयारण्यातील सर्वात उंच भाग असलेल्या महानगुड येथे विशाल गोलाकार दगड आणि हिरवळ आहे. किर्लोस्कर पॉईंट येथून संथ वाहणाऱ्या कृष्णा माईच्या डोंगर-दऱ्यांतून वाहणाऱ्या पाण्याचे विलोभनीय दृश्य अनुभवता येते.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

# संपादकीय

**नवाकाळ**

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# चातुर्मास सामाजिक ऊर्जेचा स्रोत

आषाढी एकादशीपासून सुरू होणारा चातुर्मास श्रद्धा आणि भक्तीची पर्वणीच मानली जाते. श्रावण मासात तर जवळपास सगळ्या देशभर भगवान शंकराच्या आराधनेत शिवभक्त मग्न झालेले असतात. अगदी केदारनाथपासून ते खाली दक्षिणेत रामेश्वरपर्यंत किंवा सोमनाथपासून गंगासागरपर्यंत भक्ती आणि श्रद्धेचे आगळेवेगळे वातावरण पाहायला मिळते. सध्या आपल्या महाराष्ट्रातसुद्धा श्रावण महिन्यातला भक्तीभाव म्हणजे एक आंतरिक पावित्र्याला वर्धमान करणारा महिना ठरतो. या महिन्यातल्या सगळ्या सोमवारांना होणारे उपासतापास आणि शंकराच्या मंदिरांमध्ये होणारी गर्दी, तिथे होणारी धूपारती, कर्पूरआरती आणि शिवपिंडीवर उधळला जाणारा बेलभंडार भक्तांमधल्या उत्साहाला एक वेगळेच परिमाण प्राप्त करून देतो. महाराष्ट्रात जवळपास चार ज्योतिर्लिंग आहेत. भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर, परळीवैजनाथ आणि घृष्णेश्वर या चारही ठिकाणी संपूर्ण श्रावण महिन्यामध्ये भक्तांची तुडुंब गर्दी असते. तसे पाहिले तर कार्तिक महिन्यापर्यंत हे भक्ती किंवा श्रद्धा पर्व ठळकपणाने पाहायला मिळते. आषाढातल्या एकादशीपासून दीपअमावास्या, नागपंचमी, जन्माष्टमी, नारळीपौर्णिमा, श्रावण महिन्याच्या अखेरीला येणारा मातृदिन किंवा पोळा. दहा दिवसांचा गणेशोत्सव, अश्विनातले नवरात्र आणि कार्तिकातल्या त्रिपुरीपौर्णिमेपर्यंत वेगवेगळ्या सण, उत्सव आणि व्रतांच्या निमित्ताने वातावरण भक्तीमय झालेले असते. दरवर्षी न चुकता तितक्याच उत्साहाने घडून येणारी ही प्रक्रिया हा केवळ सामान्य श्रद्धेचा आणि भक्तीपुरता मर्यादित राहत नाही. त्याच्याशी निगडित असलेली सामाजिक मानसिकताही खूप महत्त्वपूर्ण ठरते. अगदी भावभोळेपणाने केले जाणारे वेगवेगळे कर्मकांड तासन्तास रांगेत उभे राहून आपापल्या आराध्य देवतेचे घेतले जाणारे दर्शन त्यातून मिळणारे समाधान किंवा गणेशोत्सव नवरात्रोत्सवामध्ये अक्षरशः कोट्यवधी लोकांची ओसंडून वाहणारी गणेशभक्ती या सगळ्यांमधून नकळतपणे एक विशिष्ट शक्ती संचारत राहते. ती अनेकांना उत्साह देते, आत्मविश्वास वाढवते आणि नव्या नव्या संकल्पांसाठी ऊर्जाही प्रदान करते. म्हणूनच हा संपूर्ण चातुर्मास इतका भक्तीमय होतो की, त्यातूनच एक उत्सवाची सामाजिक ऊर्जा निर्माण झालेली पाहायला मिळते.

### चार पुरुषार्थांचे पर्व

खरे तर चातुर्मासाचे आध्यात्मिक महत्त्वदेखील खूप वेगळ्या स्वरूपाचे आहे. भारतीय संस्कृतीमध्ये चार पुरुषार्थांना विशेष महत्त्व दिले गेले. धर्म, अर्थ, काम मोक्ष या पुरुषार्थाची प्राप्ती झाली तर आयुष्य सत्कारणी लागले किंवा जीवनाची कृतार्थता अनुभवायला येते अशीदेखील श्रद्धा आहे. या दृष्टीकोनातून हा चातुर्माससुद्धा चतुर्विध पुरुषार्थाचे संवर्धन करणाराच ठरतो. अगदी आषाढी वारीला महाराष्ट्राची वैकुंठनगरी असलेल्या पंढरपुरात लाखो वारकरी दाखल होतात त्यातले ८० टक्के वारकरी पुन्हा आपापल्या गावी परत जातात. परंतु हे वीस टक्के वारकरी हे पुढचे चार महिने पंढरपुरात किंवा देहू आळंदी यासारख्या तीर्थक्षेत्रात मुक्कामाला असतात. सनातन परंपरेप्रमाणे ज्यांनी अध्यात्म किंवा भक्तीचा पूर्ण अंगिकार केलेला आहे. किंबहुना संन्यासाश्रम, वानप्रस्थाश्रम स्वीकारला आहे अशांनी हे चार महिने एकाच ठिकाणी थांबण्याची प्राचीन परंपरा आहे. अगदी भारतातली जेवढी काही तीर्थक्षेत्र आहेत या सर्व ठिकाणी या चातुर्मासामध्ये साधुसंतांचे चार महिन्यांचे मुक्काम ठरलेले असतात. आणि याच काळामध्ये मोठ्या प्रमाणावर पूजा, अर्चा मोठमोठे सत्संग किंवा नामसप्ताह सुरू असतात. एकाच ठिकाणी राहून साधना किंवा भक्तीसाठी एकाग्र होता यावे याकरीतासुद्धा हा चातुर्मास अत्यंत उपयुक्त मानला जातो. अक्षरशः कोट्यवधीच्या संख्येने अनेक तीर्थक्षेत्रांमध्ये या चातुर्मासाचे लाखो उपक्रम सुरू असतात. ज्याला नैष्ठिक उपासना म्हटली जाते. अनेक प्रकारचे व्रत घेऊन अध्यात्मातले संकल्प पूर्ण केले जातात. सामान्य माणूसदेखील या काळात नामस्मरणाची जपसंख्या ठरवून ते उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. श्रावण आणि भाद्रपदात हजारो ठिकाणी होणारे भागवतसप्ताह हे सगळे उपक्रम म्हणजे मानसिक किंवा आत्मिक आनंद अनुभवण्याचा सर्वात मोठा पर्व काळ मानला जातो. व्यापक अर्थाने विचार करताना ज्या चतुर्विध पुरुषार्थांसाठी चातुर्मासात व्रतवैकल्य आणि संकल्प केले जातात त्या सर्वांमधून एक सामाजिक किंवा सांस्कृतिक ऊर्जानिर्मिती होते. शब्दात न सांगता येणाऱ्या अशा चैतन्ययुक्त वातावरणाचाही आनंद या काळात घेतला जातो.

### भक्तीमंदिराचा कळस

भारतीय संस्कृती टिकून राहण्यामागची जी काही अनेक रहस्य आहेत. त्यामध्ये सामान्य माणसापासून ते साधुसंन्याशांपर्यंत हा व्रतनिष्ठपणा महत्त्वाचा ठरतो. अगदी दरवर्षीच्या गणेशोत्सवामधून किंवा अगदी आषाढी वारीच्यानिमित्ताने आपल्या महाराष्ट्रातसुद्धा एक विलक्षण वातावरण तयार झालेले असते. गणेशोत्सवात तर घराघरात, चौकाचौकात किंवा गावांमध्ये, शहरांमध्ये गणेशभक्तीचा एक आर्थिक चमत्कारच घडून येत असतो. एकीकडे गणपतीविषयी असलेली श्रद्धा आणि त्यासाठी एकत्र येण्याची पदरचे पैसे खर्च करून काही ना काही उपक्रम करण्याची विशिष्ट ऊर्मी पाहायला मिळते. भक्तीचा हाच सामाजिक आविष्कार आणि त्यामध्ये दडलेली ही ऊर्जा एकत्रित करण्याचा उद्देश लोकमान्य टिळकांनी ठेवला होता. आणि याच गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिल्यानंतर देशभरामध्ये निर्माण झालेली ही भक्तीमय सामाजिक ऊर्जा सत्कारणी लावता आली. प्राचीन काळापासूनच्या या श्रद्धा, निष्ठा, भक्ती या गुणांचे सर्व उत्सवांच्यानिमित्ताने संवर्धन होत राहिले आणि त्यातून सकारात्मक विधायक विचारही भक्कम होत गेला. संत बहिणाबाईंनी आपल्या एका कवितेमध्ये 'मंदिराच्या कळसाला लोटा कधी म्हणू नये' अशा प्रकारची भावना व्यक्त केली होती. तो मंदिराचा कळसच असतो. अश्रद्धेने त्याला लोटा म्हणून हिणावणे चुकीचे ठरते. म्हणूनच संतपरंपरेमध्येसुद्धा 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस', अशा प्रकारचे त्याची महती अभिमानाने सांगितली जाते. ही सगळी उदाहरणे म्हणजे भक्तीमंदिराचे कळसच ठरतात. यातून समाजाची एकूणच जीवनावरची श्रद्धा अधिक बलवत्तर होत राहते.

### सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**आयुष्यात व्यवहार तर खूप होतात, पण सुख विकणारा आणि दुःख विकत घेणारा कधीच भेटत नाही.**

### पंचांग

**मंगळवार, ५ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**श्रावण शुक्ल एकादशी**
**नक्षत्र : ज्येष्ठा**



**रवी उदय- ०६-१८**
**रवी अस्त- १९-११**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ११-२२ वृश्चिक**
**११-२३ ते २४-०० धनु**

**पुत्रदा एकादशी; मंगळागौरी व्रत; श्री टाकी महाराज जयंती; श्री शेवाळकर महाराज पुण्यतिथी**


मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)


## पाककृती



### शिंगाड्याचे पकोडे



★ **साहित्य** - १ कप शिंगाड्याचे पीठ, ३-४ उकडलेले बटाटे, बारीक चिरलेली कोथिंबीर, हव्या त्या भाज्या जसे पालक, गाजर, सैंधव मीठ, अर्धा चमचा जिरे, धने, बारीक चिरलेली हिरवी मिरची, इंच आल्याचा तुकडा,

★ **कृती** - क्रिस्पी शिंगाड्याचे पकोडे बनवण्यासाठी सर्वप्रथम बटाटे उकडून सोलून घ्या. नंतर एका भांड्यात चांगले मॅश करा. या मॅश केलेल्या उकडलेल्या बटाट्यामध्ये शिंगाड्याचे पीठ घाला. लक्षात ठेवा की पीठ फक्त बटाटे आणि भाज्या बांधण्यासाठी पुरेसे असावे. जास्त शिंगाड्याचे पीठ कुरकुरीतपणा कमी करेल. पालक किंवा गाजर यांसारख्या उपवासाच्या भाज्या बारीक चिरून त्यात मिसळा. तसेच बारीक चिरलेली कोथिंबीर, हिरवी मिरची आणि आल्याचा बारीक तुकडा मिक्स करा. सैंधव मीठ घाला. जिरे तळहातावर हलके चोळून टाका. जेणेकरुन त्याचा चुरा होतो. तुम्हाला हवे असेल तर धने टाका. हे ऑप्शनल आहे. सर्व साहित्य नीट मिक्स करून मळून घ्या. लक्षात ठेवा की जर तुम्हाला हे असेच बांधायचे असेल तर पाणी घालण्याची गरज नाही. फक्त बटाट्याच्या मदतीने पीठ मळून घ्या. कढईत तूप किंवा तेल गरम करून त्यात लहान आकाराचे पकोडे घालायला सुरुवात करा. सोनेरी होईपर्यंत तळून घ्या. बाहेर काढा आणि गरम चहासोबत हिरव्या चटणीसोबत सर्व्ह करा.





# भारतीय संघाने विजयश्री खेचून आणली
## ६ धावांनी विजय! कसोटी मालिका बरोबरीत

पान १ वरून

गोलंदाजी करत इंग्लंडच्या तळाच्या फलंदाजांना गुंडाळले. ३४७ धावांवर पहिला धक्का देत मोहम्मद सिराजने जेमी स्मिथला बाद केले. स्मिथने फक्त दोन धावा केल्या. त्यानंतर ९ धावांवर खेळत असलेल्या जेमी ओव्हरटनला सिराजने पायचीत केले. इंग्लंडच्या धावसंख्येत २ धावांची भर पडली नाही, तोच प्रसिद्ध कृष्णाने जोश टंगचा त्रिफळा उडवला. जोश टंगला भोपळाही फोडता आला नाही. तेव्हा ९ गडी गमावलेल्या इंग्लंडला विजयासाठी १७ धावांची आवश्यकता होती. त्यानंतर खांद्याला दुखापत झालेल्या ख्रिस वोक्स आपला एक हात गळ्यात बांधून आणि एका हातात बॅट घेऊन मैदानावर उतरला. हे पाहून स्टेडियममधील प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. दुसऱ्या बाजूला गस ॲटकिन्सनने एक मोठा षटकार मारून इंग्लंडच्या आशा जिवंत ठेवल्या. इंग्लंड विजयापासून ६ धावा दूर असताना सिराजने गस ॲटकिन्सनचा त्रिफळा उडवला. या विजयामुळे भारताने कसोटी मालिकेत २-२ ने बरोबरी साधली. लॉर्ड्सवर झालेल्या तिसऱ्या कसोटीत भारतीय संघावर इंग्लंडने २२ धावांनी विजय मिळवला होता. हा पराभव भारतीय संघाला जिव्हारी लागला होता. आजच्या विजयामुळे भारतीय संघाने त्या पराभवाची परतफेड केली. मोहंमद सिराज या सामन्याचा सामनावीर, तर भारतीय कप्तान शुभमन गिल मालिकावीर ठरला.


### गुणतालिकेत भारत तिसऱ्या स्थानावर पोहोचला

भारतीय संघाने इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत सुटली. या विजयामुळे भारताला जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेतही मोठा लाभ झाला आहे. भारतीय संघाने एका स्थानाची प्रगती करत तिसरे स्थान गाठले आहे, तर इंग्लंडची चौथ्या स्थानी घसरण झाली आहे. ओव्हल कसोटीपूर्वी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेत इंग्लंड तिसऱ्या आणि भारत चौथ्या स्थानावर होता. परंतु आता दोन्ही संघांच्या स्थानांमध्ये अदलाबदल झाली. भारताच्या खात्यात ५ सामन्यांमध्ये २ विजय, २ पराभव आणि १ अनिर्णित सामन्यासह २८ गुण जमा झाले आहेत. पाचव्या कसोटीतील विजयामुळे भारताला १२ गुण प्राप्त झाले, ज्यामुळे त्यांचे गुण १६ वरून २८ झाले आहेत. भारतीय संघाची विजयाची टक्केवारी ४६.६७ आहे. तर इंग्लंड संघाने आतापर्यंत ५ सामन्यांमध्ये २ विजय आणि २ पराभव पत्करले आहेत, तर १ सामना अनिर्णित राहिला आहे.



# लिओनेल मेस्सीला दुखापत अनिश्चित काळासाठी बाहेर

■ मेक्सिको सिटी



**इंटर** मियामीचा कर्णधार लिओनेल मेस्सी उजव्या स्नायूच्या दुखापतीमुळे अनिश्चित काळासाठी बाहेर पडला. मेक्सिकन संघ नेकाक्साविरुद्ध लीग कप सामन्यात मेस्सीला दुखापतीनंतरही इंटर मियामीने पेनल्टी शूटआउटमध्ये ५-४ असा विजय मिळवला.

मेस्सीला अवघ्या ११ व्या मिनिटाला मैदान सोडावे लागले.दुखापतीची तीव्रता लक्षात घेऊन त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. इंटर मियामीच्या निवेदनानुसार मेस्सीच्या उजव्या पायाच्या स्नायूला किरकोळ दुखापत झाल्याची पुष्टी अहवालात करण्यात आली. त्याची वैद्यकीय स्थिती आणि उपचारांना मिळालेल्या प्रतिसादाच्या आधारे त्याला खेळण्याची परवानगी दिली जाईल.

# फखर जमान वेस्ट इंडिजविरुद्ध एकदिवसीय मालिकेतून बाहेर

■ लॉडरहिर्ल



**पाकिस्तान** क्रिकेट संघाचा सलामीवीर फखर जमान वेस्ट इंडिजविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० आणि आगामी ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला. लॉडरहिलमध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यादरम्यान त्याच्या डाव्या मांडीच्या स्नायूला झालेल्या दुखापतीमुळे हा निर्णय घेण्यात आला. त्याच्या जागी खुशदिल शाहला तिसऱ्या टी-२० सामन्यासाठी प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान देण्यात आले. वेस्ट इंडिजच्या डावाच्या १९ व्या षटकांत क्षेत्ररक्षण करताना फखर झमानला दुखापत झाली. त्यानंतर संघाच्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी त्याची तपासणी केली आणि त्याच्या डाव्या मांडीच्या स्नायूमध्ये थोडासा ताण असल्याचे पुष्टी केली. लाहोरमध्ये होईल पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) सांगितले की, फखर तिसऱ्या आणि निर्णायक टी-२० सामन्यानंतर दुसऱ्या दिवशी ४ ऑगस्ट रोजी पाकिस्तानात परतेल.

# विश्वचषक हॉकी स्पर्धेसाठी अमेरिकन महिला संघ पात्र

■ माँटेव्हिडिओ

**बेल्जियम** आणि नेदरलँड्स यांच्या संयुक्त यजमानपदाने २०२६ मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या महिलांच्या विश्वचषक हॉकी स्पर्धेसाठी अमेरिकन महिला हॉकी संघाने आपली पात्रता सिद्ध केली.उरुग्वे येथे पात्र फेरीच्या स्पर्धेतील झालेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात अमेरिकन महिला हॉकी संघाने उरुग्वेवर थरारक विजय मिळवून आगामी विश्वचषक हॉकी स्पर्धेचे तिकिट आरक्षित केले.

पात्र फेरीच्या स्पर्धेतील दुसऱ्या उपांत्य सामन्यात अर्जेटिनाने चिलीचा पराभव केला. आता पात्र फेरी स्पर्धेमध्ये अर्जेटिना आणि अमेरिका यांच्यात अंतिम सामना खेळविला जाईल. अर्जेंटिना महिला हॉकी संघाने यापूर्वीच आगामी महिलांच्या विश्वचषक हॉकी स्पर्धेचे तिकिट निश्चित केले. आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या हॉकी प्रो-लीग स्पर्धेत दुसरे स्थान मिळविल्याने अर्जेटिना विश्वचषक हॉकी स्पर्धेसाठी पात्र ठरला.नेदरलँड्स या स्पर्धेत पहिल्या स्थानावर राहिला. २०२५साली झालेल्या पॅन अमेरिकन चषक हॉकी स्पर्धेत अमेरिकेने पहिल्या दोन क्रमांकामधील आपले स्थान निश्चित केले आहे.पात्र फेरीच्या स्पर्धेत अमेरिकेचा ब गटात समावेश होता.अमेरिकेने या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात मेक्सिकोचा १०-० अशा गोलफरकाने एकतर्फी पराभव केला.त्यानंतर अमेरिकन महिला संघाने चिलीवर ५-२ अशी मात करत आपल्या गटात आघाडीचे स्थान मिळविले.

# निम्हण स्मृती राज्य कॅरम स्पर्धेत प्रशांत-समृद्धीला प्रथम मानांकन

■ मुंबई

**सोमेश्वर** फाऊंडेशनच्या वतीने आणि झेनेटीक स्पोर्ट्सच्या सहकार्याने गोविंदा गार्डन मंगल कार्यालय,सोमेश्वर कॉर्नर,बाणेर,पुणे येथे ८ ते १० ऑगस्टदरम्यान रंगणाऱ्या दुसऱ्या कै.विनायक निम्हण स्मृती राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरी गटात मुंबईच्या विश्वविजेत्या प्रशांत मोरे तर महिला एकेरी गटात ठाण्याच्या समृद्धी घाडिगावकरला प्रथम मानांकन देण्यात आले.

८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता पुरुष एकेरी गटाने स्पर्धेला सुरुवात होणार असून महिला एकेरी गटाचे सामने ९ तारखेपासून खेळविण्यात येणार आहेत.महाराष्ट्र कॅरम असोसिएशन व कॅरम असोसिएशन ऑफ पुणे यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत राज्यातून १८० खेळाडूंनी भाग घेतला आहे.विजेत्यांना १ लाख १० हजारांच्या रोख पारितोषिकांनी गौरविण्यात येणार असल्याचे सोमेश्वर फाउंडेशनचे अध्यक्ष सनी निम्हण यांनी सांगितले.

**पुरुष एकेरी:** १) प्रशांत मोरे (मुंबई), २) झैद अहमद फारुकी (ठाणे), ३) विकास धारिया (मुंबई), ४) समीर अंसारी (ठाणे), ५) राहुल सोलंकी ९ मुमबी ), ६) रियाझ अकबर अली (रत्नागिरी ), ७) अभिषेक चव्हाण (रत्नागिरी ), ८) अभिजित त्रिपनकर (पुणे).

**महिला एकेरी:** १) समृद्धी घाडीगावकर (ठाणे), २) आकांक्षा कदम (रत्नागिरी), ३) प्राजक्ता नारायणकर (मुंबई उपनगर), ४) अंबिका हरिथ (मुंबई), ५) केशर निर्गुण (सिंधुदुर्ग), ६) निलम घोडके (मुंबई), ७) मधुरा देवळे (ठाणे), ८) उर्मिला शेंडगे (मुंबई).

# ऑस्ट्रेलियाविरुद्ध ४ सामन्यांसाठी भारतीय हॉकी संघाची घोषणा

■ नवी दिल्ली

**आशिया** हॉकी कप ही पुढील वर्षी नेदरलँड्स आणि बेल्जियममध्ये होणाऱ्या विश्वचषकासाठी पात्रता स्पर्धा आहे,जी २९ ऑगस्टपासून बिहारमधील राजगीर येथे खेळवली जाईल.त्याच्या तयारीसाठी भारतीय संघ १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान पर्थमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध चार सामने खेळणार आहे.या स्पर्धेत हरमनप्रीत भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे तर कृष्ण पाठक आणि सूरज करकेरा गोलकीपिंगची जबाबदारी सांभाळतील.बचावफळीत सुमित, जर्मनप्रीत सिंग,संजय,अमित रोहिदास,नीलम संजीप सेस,जुगराज सिंग आणि कर्नाटकचा नवीन खेळाडू पूवन्ना असेल.

# इंडियन ग्रा प्री-३ ॲथलेटिक्स स्पर्धेच्या गोळाफेकमध्ये तेजिंदर पालसिंगला विजेतपद

■ लुधियाना

**लुधियाना** येथील गुरुनानक स्टेडियममध्ये घेण्यात आलेल्या इंडियन ग्रा प्री-३ ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताचे ऑलिम्पिक ॲथलिट्स तेजिंदरपालसिंग तूर, सर्वेश कुशारे आणि विथिया रामराज यांनी विविध क्रीडा प्रकारात विजेतेपद मिळविले.पुरुषांच्या गोळाफेक प्रकारात आशियाई क्रीडा स्पर्धेतील विद्यमान विजेता तेजिंदरपालसिंगने १८.९३ मी.ची नोंद करत सुवर्णपदक, इकबालसिंग चहलने १७.४६ मी.ची नोंद करत रौप्य आणि साहिब सिंगने १७.२५ मी.ची नोंद करत कांस्यपदक मिळविले. २०२१ साली पतियाळा येथे झालेल्या इंडियन ग्रा प्री-४ स्पर्धेत तेजिंदरपालसिंगने गोळाफेक या प्रकारात २१.४९ मी.चा राष्ट्रीय विक्रम नोंदविला होता. पुरुषांच्या उंच उडीत सर्वेश कुशारेने २.२३ मी.ची नोंद करत सुवर्णपदक मिळविले. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत सर्वेशने भारताचे प्रतिनिधीत्व केले होते. सर्वेशने बंगळूरू येथील झालेल्या इंडियन खुल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत तेजस्विन शंकरने नोंदविलेला २.२१ मी.चा राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला.महिलांच्या ४०० मी.अडथळयाच्या शर्यतीत विथिया रामराजने ५५.४२ सेकंदाचा अवधी घेत सुवर्णपदक मिळविले. तिने भारताची माजी धावपटू पी.टी. उषाच्या विक्रमाशी बरोबरी साधली.या क्रीडा प्रकारात मौमी जेनाने १ मिनिट, ०२.८५सेकंदाचा अवधी घेत रौप्यपदक आणि ॲलिना व्हर्गिसने १ मिनिट,०४.०२ सेकंदाचा अवधी घेत कांस्यपदक मिळविले. पुरुषांच्या भालाफेकमध्ये यशवीर सिंगने ७७.८९ मी.ची नोंद करत सुवर्णपदक, मनजिंदर सिंगने ७१.०१मी.ची नोंद करत रौप्यपदक तर गौरव पटेलने ७०.३६ मी.ची नोंद करत कांस्यपदक घेतले.

# १९५७ साली राष्ट्रीय दिनदर्शिकेचा
## केंद्र सरकारने अधिकृतरीत्या स्वीकार केला

**राष्ट्रीय दिनदर्शिका ही भौतिकशास्त्रज्ञ डॉ. मेघनाथ साहा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सुचविलेली आणि २२ मार्च १९५७ रोजी केंद्र सरकारने अधिकृतरीत्या स्वीकारलेली दिनदर्शिका. ती खगोलशास्त्रावर आधारित असून ऋतुचक्र, भौगोलिक परिस्थिती इ. अनेक घटकांचा सखोल विचार करून तयार करण्यात आली आहे. म्हणूनच तिचा प्रचार व प्रसार होणे गरजेचे आहे. कालगणनेच्या बाबतीत भारतात खूपच विविधता आहे. काही पद्धतींत चांद्र महिने विचारात घेतात तर काही पद्धतींत सौर महिने. महिन्यांची कालगणना चंद्रभ्रमणावरून केली तर १२ महिन्यांचे वर्ष संपल्यावर होणाऱ्या एकूण दिवसांची संख्या ३५४ होते. त्यामुळे चांद्र वर्षांचा ऋतूंशी मेळ राहत नाही. ऋतू हे सूर्यभ्रमणावर अवलंबून आहेत आणि म्हणूनच सूर्याचे वार्षिकभ्रमण विचारात घेणारी राष्ट्रीय दिनदर्शिका व्यवहारात सोयीची पडते.**








**सरासरी** २४ तासांचा दिवस ही कल्पना सोयीची होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर पाच वर्षांनी म्हणजे १९५२ च्या सुमारास तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी पंचांग सुधारणा समिती (राष्ट्रीय कॅलेंडर समिती) या नावाने समिती नेमली. या समितीचे अध्यक्ष डॉ. मेघनाथ साहा हे केवळ भौतिकशास्त्रज्ञच नव्हते तर ते काही काळ लोकसभेचे खासदारही होते. या समितीचे मुख्य काम असे होते की, भारतीय भौगोलिक परिस्थिती, ऋतुचक्र इ. सर्वांगीण बाबींचा विचार करून आपल्या देशासाठी दिनदर्शिका सुचवणे. या पंचांग सुधारणा समितीने सर्व बाबींचा सखोल विचार करून त्यानुसार जी दिनदर्शिका सुचविली, ती केंद्र सरकारने राष्ट्रीय दिनदर्शिका म्हणून २२ मार्च १९५७ या दिवसापासून अधिकृतपणे स्वीकारली.

हा दिवस राष्ट्रीय दिनदर्शिकेप्रमाणे १ चैत्र १८७९ असा होता. आता आपण राष्ट्रीय दिनदर्शिका कशी आहे हे थोडक्यात समजून घेऊयात. राष्ट्रीय दिनदर्शिकेमध्ये १२ महिन्यांची नावे जानेवारी ते डिसेंबर अशी नाहीत, त्यातील महिन्यांची नावे व वर्षारंभाचा दिवस इ. गोष्टी वेगळ्या आहेत. जानेवारी ते डिसेंबर ही नावे व्यक्तिसापेक्ष आहेत. उदा. जुलै हे नाव ज्युलिअस सीझरच्या नावाने पडले आहे तर ऑगस्ट हे नाव ऑगस्टस या राजाच्या नावावरून पडले आहे. मात्र राष्ट्रीय दिनदर्शिकेच्या १२ महिन्यांची नावे चैत्र ते फाल्गुन अशाच क्रमाने आहेत. फक्त मार्गशीर्ष महिन्याचे नाव 'अग्रहायण' असे आहे. ही १२ महिन्यांची नावे व्यक्तिसापेक्ष नसून ती नक्षत्रांची नावे आहेत. म्हणजेच राष्ट्रीय दिनदर्शिका ही खगोलशास्त्राशी संबंधित असून, तिचे नाते हे आकाशाशी मिळतेजुळते आहे.

राष्ट्रीय दिनदर्शिकेचा वर्षाचा पहिला दिवस (लीप वर्ष सोडून) २२ मार्च हा असतो. या तारखेला राष्ट्रीय दिनदर्शिका १ चैत्र या नावाने संबोधते. राष्ट्रीय दिनदर्शिकेचे वैशाखापासूनचे महिने व महिन्यांचे दिवस हे प्रचलित दिनदर्शिकेच्या खालील तारखांना सुरू होतात- वर्षांचा क्रमांक शालिवाहन शकाप्रमाणे घेतात. त्यामुळे राष्ट्रीय दिनदर्शिकेत महिन्याचे दिवस एक आड एक ३० किंवा ३१ असे घेत नाहीत. सूर्य उत्तर गोलार्धात असल्याचा काळ त्याच्या दक्षिण गोलार्धातील कालावधीपेक्षा थोडा जास्त असल्यामुळे राष्ट्रीय दिनदर्शिकेत वैशाख ते भाद्रपद या कालावधीत येणारे ५ सौर महिने प्रत्येक ३१ असून, उरलेल्या ७ महिन्यांचे दिवस प्रत्येकी ३० घेतात. अशा तऱ्हेने ३६५ दिवसांचे वर्ष पूर्ण होते. जे इंग्रजी वर्ष 'लीप' असते, त्या वर्षी सुरू होणारे राष्ट्रीय वर्षही 'लीप वर्ष' घेतात. अशा 'लीप' वर्षांची सुरुवात २२ मार्चला न होता २१ मार्चला करतात आणि त्या वर्षी चैत्र महिन्याचे ३१ दिवस घेतात. राष्ट्रीय दिनदर्शिकेची शास्त्रीय बैठक या दिनदर्शिकेची शास्त्रीय बैठक, सौर वर्षांची तसेच सौर महिन्यांची सुरुवात केव्हा करायची यात आहे. सूर्य उत्तर गोलार्धात प्रवेश करतो, त्या दिवशी जगात सर्वत्र १२ तासांचा दिवस आणि १२ तासांची रात्र असते. म्हणून त्या दिवशी नवीन वर्षाची सुरुवात केली जाते.

साहजिकच ही तारीख १ चैत्र असते (इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे ही तारीख २२ मार्च असते. म्हणजे अधली-मधलीच तारीख झाली.) पुढे अदमासे ३ महिन्यांनी सूर्य जास्तीत जास्त उत्तरेकडे जातो. भूगोलाच्या भाषेत सांगायचे तर त्या दिवशी २३ १/२ उत्तर अक्षांशावर राहणाऱ्या लोकांच्या बरोबर माथ्यावर सूर्य माध्यान्ही तळपतो, आणि आपला मोहरा दक्षिणेकडे वळवतो. या दिवशी दक्षिणायन सुरू होते. हाच दिवस १ आषाढ म्हणून घ्यावा, अशी राष्ट्रीय दिनदर्शिकेची शिफारस आहे. या दिवशी कोणताच इंग्रजी महिना सुरू होत नाही. उलट इंग्रजी महिन्याची ती अधलीमधली तारीख असते (२२ जून).

यानंतर तीन महिन्यांनी सूर्य जेव्हा दक्षिण गोलार्धात प्रवेश करतो, तेव्हा पुन्हा एकदा दिवस व रात्रीची समानता आपण अनुभवतो. या दिवशी १ अश्विन ही तारीख राष्ट्रीय दिनदर्शिकेने निश्चित केली आहे. (२३ सप्टेंबरशी ही तारीख जुळते.) दक्षिण गोलार्धात प्रवेश केलेला सूर्य आणखी दक्षिणेकडे सरकत जातो. दक्षिणेकडे जाण्याची कमाल मर्यादा गाठण्यास त्याला अदमासे तीन महिने लागतात. या दिवशी उत्तरायण सुरू होते. हा दिवस म्हणजे पौष महिन्याची सुरुवात म्हणजे १ पौष असे राष्ट्रीय दिनदर्शिकेने ठरविले आहे (२२ डिसेंबर). यावरून राष्ट्रीय दिनदर्शिकेची वैशिष्ट्ये आणि त्याची शास्त्रीय बैठक लक्षात येईल. चैत्र, आषाढ, आश्विन आणि पौष या महिन्यांची सुरुवात सूर्याच्या स्थानांशी निगडित आहे. चैत्र आणि आश्विन महिन्याच्या सुरुवातीला (अनुक्रमे २२ मार्च आणि २३ सप्टेंबर) सूर्य वैषुविक वृत्तावर असतो. दिवस आणि रात्र समान असतात. आषाढ महिन्याच्या १ दिनांकापासून (२२ जून) दक्षिणायन सुरू होते, तर पौष महिन्याची म्हणजे उत्तरायणाची सुरुवात असते. (२२ डिसेंबर) इंग्रजी महिन्याची सुरुवात सूर्याच्या अशा विशिष्ट स्थानांशी निगडित नाही.

वैशाख ते भाद्रपद या महिन्यांचे प्रत्येकी ३१ दिवस घेण्यामागील भूमिकाही आपण पाहिली. असे हे राष्ट्रीय कॅलेंडर आपल्या देशाने अधिकृतरीत्या स्वीकारले असल्याने या दिनदर्शिकेला सध्यातरी घटनात्मक पाठिंबा आहे. स्वातंत्र्यानंतर इतर राष्ट्रीय बोधचिन्हे किंवा पद्धतीत बदल घडून आले म्हणजे कमळाला राष्ट्रीय फुलाचा दर्जा दिला गेला, तर मोर हा राष्ट्रीय पक्षी म्हणून मानला गेला. त्याप्रमाणे ही दिनदर्शिकादेखील राष्ट्रीय दिनदर्शिका म्हणून स्वीकारली गेली. मेट्रिक वजनमापे चलनासाठी रुपये, पैसे हे बदलही १९५७ पासून स्वीकारण्यात आले. आज हे दोन बदल रूढ झाले आहेत.

१६ आण्यांचा १ रुपया म्हणजे काय, हे आता नवीन पिढीला उलगडणारही नाही. मैल गेले, किलोमीटर आले हे बदल स्वीकारले गेले असले तरी आपल्या दैनंदिन व्यवहारात राष्ट्रीय दिनदर्शिकेचा समावेश सहजतेने होईल अशी काळजी सरकारने घेतली नाही. असे असले तरी ही राष्ट्रीय दिनदर्शिका जनमानसात लोकप्रिय होत असून समाजातील सुजाण व वैज्ञानिक दृष्टिकोन असणाऱ्या नागरिकांनी या राष्ट्रीय दिनदर्शिकेचा वापर कागदोपत्री सुरू केलेला आहे. ही राष्ट्रीय दिनदर्शिका आपण कागदोपत्री वापरू शकतो, कारण केंद्र सरकारने 'राष्ट्रीय केंद्र दिनदर्शिका' ही अधिकृतरीत्या स्वीकारली आहे. तसेच इंडियन बँक असोसिएशननेदेखील तसे तपशीलवार पत्रक ७ जानेवारी २०१३ रोजी काढले असून ते सर्व बँकांना पाठवले आहे. या पत्रकानुसार राष्ट्रीय सौर दिनांक जर चेकवर लिहिला असेल तर ती तारीख अवैध मानू नये.

तसेच सेकंडरी स्कूल कोडमधील परिशिष्ट क्रमांक १८ नुसार शाळांनादेखील एक एप्रिल १९५७ किंवा त्यानंतर जन्माला आलेल्या विद्यार्थ्यांचा जन्मदिनांक राष्ट्रीय दिनदर्शिकेप्रमाणे नोंदला जावा अशा प्रकारची तरतूद केली आहे. औरंगाबाद आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांनी राष्ट्रीय दिनदर्शिकेच्या वापराबाबत ठराव संमत केले आहेत. औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत दिल्या जाणाऱ्या जन्म-मृत्यूच्या दाखल्यावर राष्ट्रीय सौर आणि ग्रेगरिअन अशा दोन्ही तारखा टाकण्यात येतात.

डोंबिवलीतील एका सांस्कृतिक परिवाराने राष्ट्रीय दिनदर्शिकेच्या वापराबाबत पुढाकार घेतला आहे व त्या दृष्टीने जनजागृती करण्याची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली आहे. मराठी विज्ञान परिषद, ठाणे यांनीही यासंबंधीची जनजागृती केली होती. पुण्यातील पुणे जनता सहकारी बँकेने अशा प्रकारची दिनदर्शिका प्रसिद्ध केलेली आहे. कल्याणमधील ज्येष्ठ खगोल अभ्यासक हेमंत मोने यांचे राष्ट्रीय दिनदर्शिकेच्या प्रसाराचे कार्यदेखील उल्लेखनीय आहे. औरंगाबाद येथे राष्ट्रीय दिनदर्शिका प्रसार मंचची स्थापना झाली असून, राष्ट्रीय दिनदर्शिकेच्या प्रसाराचे व जनजागृतीचे काम हा मंच करीत आहे. अशा राष्ट्रीय दिनदर्शिकेचा वापर तसेच प्रसार खालील कृतीने साध्य करू शकतो-

१) आपण स्वतः व्यक्तिगत पातळीवर इंग्रजी व राष्ट्रीय तारखांचा बरोबरीने वापर करू या.
२) राष्ट्रीय तारीख चेकवर वैध आहे असा रिझर्व बँकेचा आदेश असल्यामुळे बँकेच्या चेकवर फक्त राष्ट्रीय तारीख लिहू या. त्याबाबत काही अडचण आल्यास त्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न करू या.
३) शालेय अभ्यासक्रमात याचा वापर करू या.
४) राष्ट्रीय दिनदर्शिकेच्या तारखांचा समावेश सध्या प्रचलित असलेल्या विविध दिनदर्शिकांमध्ये करण्यासंबंधी प्रयत्न करू या.
५) राष्ट्रीय दिनदर्शिका प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था यांच्याकडून स्वतःसाठी दिनदर्शिका खरेदी करू या. प्रयत्नांना आर्थिक मदत किंवा प्रोत्साहन देऊ या.
६) पत्रव्यवहारासाठी इंग्रजी दिनांकाबरोबर सौर दिनांक वापरू या.
७) राष्ट्रीय दिनदर्शिकेच्या प्रसारासाठी आपल्या सोसायटीत किंवा संस्थेत एखादी बैठक आयोजित करू या.
८) मार्गदर्शनासाठी सौर कॅलेंडरबाबत आस्था आणि माहिती असणारी व्यक्ती आमंत्रित करू या.
९) चेकवर राष्ट्रीय सौर दिनांक टाकण्यासाठी किमान १० व्यक्तींना प्रवृत्त करू या.
१०) राष्ट्रीय दिनदर्शिकेच्या प्रचारासाठी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा संकल्प करू या.

राष्ट्रीय दिनदर्शिका हे एक राष्ट्रीय प्रतीक असून आपल्या देशाची अस्मिता आहे. विज्ञानाच्या प्रसारामुळे राष्ट्रीय दिनदर्शिका वैज्ञानिक दृष्टिकोन असणाऱ्या सुजाण नागरिकांमध्ये झपाट्याने लोकप्रिय होत आहे. इंग्रजी तारीख संगणकाला पुरवली असता संगणकावर इंगजी तारखेचे भारतीय राष्ट्रीय सौर तारखेत त्वरित रूपांतर होते, अशी प्रणाली संगणकाच्या तंत्रज्ञानाने आता विकसित झाली आहे. नवनवीन कल्पनांचा स्वीकार व कालबाह्य पद्धतीचा त्याग ही तर वैज्ञानिकतेची लक्षणे आहेत.

समाजात व जनमानसात राष्ट्रीय दिनदर्शिकेचा झपाट्याने प्रसार होत असून त्यायोगे समाजात एक क्रांतिकारी आणि वैज्ञानिक बदल घडून येत आहे. या बदलाचा आपणही एक घटक बनू या व आपल्या राष्ट्रीय अस्मितेचा यथोचित सन्मान करू या.

# मुंबई-गोवा महामार्गावर कार-दुचाकी अपघात
## महिलेचा जागीच मृत्यू

■ सिंधुदुर्ग

मुंबई-गोवा महामार्गावर कसाल येथील खालसा धाब्याजवळ आज दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास कार आणि दुचाकी यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या शमिका पवार (वय २७) यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचे अपंग पती शशांक पवार (वय ४०), चार महिन्यांची मुलगी पवित्रा आणि साडेतीन वर्षांचा मुलगा प्रभास हे सुदैवाने बचावले.

शशांक पवार हे पत्नी आणि मुलांना घेऊन दुचाकीवरून कणकवलीकडून येत होते. त्याच वेळी गोव्याहून मुंबईच्या दिशेने भरधाव वेगाने येणारी इर्टिका कार त्यांच्या दिशेने आली. शशांक पवार यांनी अचानक विरुद्ध लेनमध्ये दुचाकी नेण्याचा प्रयत्न केला आणि त्याच क्षणी कारने त्यांच्या मोपेडला जोरदार धडक दिली. या धडकेत शमिका पवार रस्त्यावर फेकल्या गेल्या आणि डोक्याला गंभीर इजा झाल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच ओरोस पोलीस, महामार्ग पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी कारचालकाला ताब्यात घेतले असून, त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, अपघातग्रस्त कुटुंबाच्या पुनर्वसनाची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

# विजेच्या धक्क्याने बिहारच्या पाच कावडियांचा मृत्यू

■ पाटणा

**बिहारमधील** भागलपूर जिल्ह्यातील शाहकुंड पोलीस ठाण्याच्या हद्दीत विजेच्या धक्क्याने पाच कावडियांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत ४ जण गंभीर जखमी झाले आहेत.

शाहकुंड ते सुलतानगंज मार्गावर महतो गावाजवळ ही घटना घडली. एकूण १० कावड यात्रेकरु एका टेम्पोमधून जात असताना रात्री अकरा वाजताच्या सुमारास त्यांच्या गाडीचा स्पर्श विजेच्या तारेला झाला. त्यामुळे वाहनात वीजप्रवाह उतरून ते शेजारच्या नदीत पडले. त्यात ५ जणांचा मृत्यू झाला. तर चौघेजण गंभीर जखमी झाले. या गाडीचा चालक झाला आहे.

# महादेव मुंडेंना ओळखत नाही वाल्मिक कराडच्या मुलाचा दावा
## पोलिसांवर विश्वास व्यक्त केला

■ बीड

बीड जिल्ह्यातील महादेव मुंडे हत्या प्रकरणात वाल्मिक कराडसह त्याच्या दोन्ही मुलांचा हात असल्याचा आरोप आहे. परंतु वाल्मिक कराडचा मुलगा सुशील कराडने आम्ही महादेव मुंडे यांना ओळखत नसल्याचा दावा केला. सुशील कराडने सांगितले की, या प्रकरणात आमची कोणतीही चौकशी झालेली नाही. या प्रकरणात २० महिन्यांनंतर आमचे नाव घेतले जात आहे. त्यात किती सत्यता आहे? या प्रकरणाचा तपास करणाऱ्या पोलीस पथकावर आमचा विश्वास आहे. महादेव मुंडे यांना मी, माझा भाऊ किंवा माझे वडीलही ओळखत नव्हते. या प्रकरणी एसआयटी व सीआयडी चौकशीची मागणी केली जात आहे. पण आमची हात जोडून विनंती आहे की, याप्रकरणी सीबीआय चौकशी झाली पाहिजे. त्यातून सत्य पुढे येईल. त्यांना काय सिद्ध करायचे आहे? त्यांच्याकडे काही पुरावे असतील, तर आमच्याकडेही काही पुरावे आहेत. यासंबंधी आमचे संपूर्ण कुटुंब पत्रकार परिषद घेणार आहे. त्यात आम्ही आमची बाजू मांडू. श्रीगणेश परदेशात पळून जाणार आहे, त्यांनी सांगितले की, माझा भाऊ परदेशात पळून जाण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्याचे पुरावे द्या. माझा व माझ्या वडिलांचा पासपोर्ट नाही. त्याला पळून जायचे असते तर तो यापूर्वीच गेला असता. पण आमचा या प्रकरणाशी कोणताही संबंध नाही हीच वस्तुस्थिती आहे.

# पुण्यात आप पक्षाचे वृक्षतोडीविरुद्ध आंदोलन

■ पुणे

पुणे शहरातील छत्रपती संभाजीनगर उद्यानात आज आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पालिकेच्या वृक्षतोडीविरोधात आंदोलन केले. माहिती अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांच्या आधावर आप कार्यकर्त्यांनी पुणे पालिकेवर २५ हजार झाडांची बेकायदेशीर कत्तल, साडेतीन लाख झाडे केवळ कागदोपत्री अस्तित्वात आणि २५ कोटी रुपयांचा निधीच्या गैरवापराचा ठपका ठेवला. आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, या संदर्भात पालिकेला अनेक वेळा निवेदने, तक्रारी, पत्रव्यवहार करूनही महानगरपालिकेने त्याकडे दुर्लक्ष केले. वृक्षतोडीला दिलेल्या बेकायदेशीर परवानगीबाबत दिल्याचे ठोस पुरावे आहेत. परंतु पीएमसीकडून त्यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

# डिझेल अभावामुळे मच्छीमार नौका बंदरातच! मच्छिमारांना फटका

■ उरण

रायगड जिल्ह्यातील शेकडो यांत्रिक मच्छिमार नौका डिझेल अभावामुळे बंदरातच अडकल्या आहेत. १ ऑगस्टपासून सुरू झालेल्या खोल समुद्रातील मासेमारीच्या हंगामाला डिझेलच्या अभावी मोठा फटका बसला आहे. विशेष म्हणजे, मत्स्य विभागाच्या धोरणात अचानक झालेल्या बदलामुळे मच्छिमारांच्या व्यवसायावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

राज्य सरकारने मच्छिमार संघटनांसाठी एक लाख ६८ हजार किलो लिटर करमुक्त डिझेल कोटा जाहीर केला होता. मात्र, ३१ जुलै रोजी उशिरा पाठविण्यात आलेल्या अधिकृत पत्रानुसार रायगडमधील ४१ मच्छिमार संस्थांना इंडियन ऑईलऐवजी इतर कंपन्यांकडून डिझेल खरेदी करण्याचे आदेश देण्यात आले. या निर्णयामुळे गोंधळ निर्माण झाला आहे. मच्छिमार संस्थांकडे इतर कंपन्यांकडून डिझेल खरेदी करण्यासाठी आवश्यक असलेले परवाने, डिझेल टाक्या आणि वाहतूक साधने उपलब्ध नाहीत. परिणामी, डिझेल मिळवणे अशक्य झाल्याने मच्छिमारांची समुद्रातील मासेमारी थांबली आहे. यामुळे शेकडो नौका बंदरातच उभ्या राहिल्या आहेत. मच्छिमारांना खासगी पेट्रोल पंपावरून डिझेल खरेदी करावे लागले, तर त्यांना प्रति लिटर १८ ते २० रुपये अधिक खर्च येणार आहेत. या अतिरिक्त खर्चामुळे मच्छिमारांवर आर्थिक ताण आणखी वाढला आहे. त्यामुळे या परिस्थितीला तातडीने निराकरण करण्याची आवश्यकता असल्याचे मच्छिमार संघटनांनी सांगितले. त्यांनी मत्स्य विभागाच्या या निर्णयाला तीव्र विरोध केला असून, सरकारकडून योग्य उपाययोजना न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# कोथरूड पोलिसांवर तीन तरुणींचा छळाचा आरोप

■ पुणे

कोथरूड पोलिसांनी आक्षेपार्ह भाषा वापरून आपला छळ केल्याचा धक्कादायक आरोप तीन तरुणींनी केला आहे. या प्रकरणावरून राज्यात राजकीय वातावरण तापले. शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार आणि वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर रात्री उशिरापर्यंत पुणे पोलीस आयुक्तालयात ठाण मांडून बसले होते. मात्र, तरीही पोलिसांनी एफआयआर दाखल केला नाही. त्यावरून वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पोलिसांना चांगलेच सुनावले.

छत्रपती संभाजीनगर येथून २३ वर्षीय विवाहित महिला तिच्या घरातून पती व सासरच्या जाचाला कंटाळून पळून आली होती. तिने एका दिवसासाठी तक्रारदार मुलींच्या कोथरुडमधील खोलीत आसरा घेतला होता.

# सत्तेतील लोकांमुळे मुंबईचा श्वास कोंडला! हंसल मेहतांची खंत

■ मुंबई

सत्तेत असलेल्या लोकांमुळे या शहराचा श्वास कोंडला आहे. ते त्यांचा फायदा करून घेत आहेत. त्यांना लोकांची पर्वा नाही, असे वक्तव्य बॉलीवूडमधील दिग्दर्शक हंसल मेहता यांनी केले आहे.

हंसल मेहता हे नेहमी स्पष्टपणे त्यांची मते मांडत असतात. अशातच आता त्यांनी मुंबईतील वाढता कचरा, प्रदूषण, एकूणच येथील राहणीमानाची पद्धत यांबाबत सोशल मीडियावर पोस्ट करीत प्रतिक्रिया दिली आहे. त्यात ते म्हणतात की, मी नुकताच श्रीलंकेतील कोलंबोहून परतलो आहे. हा एक असा देश आहे, जिथे अलीकडेच मोठा आर्थिक आणि राजकीय गोंधळ झाला होता. तरीही त्या देशाची राजधानी आपल्यासारख्या महाशक्तीच्या आर्थिक राजधानीपेक्षा स्वच्छ, नीटनेटकी आणि चांगली आहे. जेव्हा मी परदेशातून परततो, तेव्हा इथली(मुंबईतील) अस्वच्छता पुन्हा डोळ्यांसमोर उभी राहते. आपण याकडे दुर्लक्ष करतो, कारण आपल्याकडे लोकसंख्या जास्त आहे. आपण असे किती काळ जगत राहणार? माझे या शहरावर प्रेम आहे.

# लस शास्त्रज्ञाच्या शिक्षेला स्थगिती

■ नवी दिल्ली

लस शास्त्रज्ञ डॉ. आकाश यादव यांना त्यांच्या पत्नीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याच्या प्रकरणात झालेल्या शिक्षेला उत्तराखंड उच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली आहे. न्यायालयाने म्हटले की, डॉ. यादव यांचे काम लस विकासाशी संबंधित आहे, जे सार्वजनिक आरोग्य आणि राष्ट्रीय हितासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

डॉ. यादव यांच्या पत्नीने २०१५ मध्ये आत्महत्या केली होती. सुसाईड नोटमध्ये तिने पतीला जबाबदार धरले होते. त्यावेळी त्यांच्या लग्नाला फक्त ७ महिने झाले होते. डॉ. यादव यांच्यावर हुंडा छळ प्रकरणात आणि नंतर त्यांच्या पत्नीच्या आत्महत्येच्या प्रकरणात आरोपी करण्यात आले होते.

जानेवारीमध्ये, डॉ. यादव यांना कनिष्ठ न्यायालयाने हुंड्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त केले होते. परंतु आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल त्यांना पाच वर्षांची शिक्षा आणि २०,००० रुपये दंड ठोठावण्यात आला होता.

# ठाण्यातील वाहतूक कोंडी तातडीने दूर करा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे निर्देश

■ ठाणे

ठाणे आणि परिसरातील वाहतूक कोंडीमुळे नागरिक अतिशय त्रस्त झाले आहेत. सर्व यंत्रणांनी समन्वय साधून हा परिसर वाहतूक कोंडीमुक्त करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. एकनाथ शिंदे यांनी आज ठाण्यातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट आदी अधिकारी उपस्थित होते. यावेळी शिंदे म्हणाले की, ठाण्यात कोपरी, माजिवडा यासोबत घोडबंदर रस्ता, गायमुख घाट ते फाउंटन हॉटेल, शिळफाटा परिसर येथे सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळी होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. त्याबद्दलच्या तक्रारी वारंवार येत असून सर्व यंत्रणांनी समन्वय साधून हा पूर्ण परिसर वाहतूक कोंडीमुक्त करावा. त्याचबरोबर, वाहतुकीचे व्यवस्थित नियोजन करून ठाणे, भिवंडी, शिळफाटा आणि कोपरी या चारही भागातील वाहतूक कोंडीवर मात करावी. रस्ते दुरुस्ती करताना त्या कामाचा दर्जा चांगला असावा.

**ओटीटी प्लॅटफॉर्म सुरु झाला त्यावेळी काही वेगळ्या विषयावरील सीरिज दाखवण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र त्यानंतर अशा एकाच विषयावरील अनेक सीरिज वेगवेगळ्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर पाहायला मिळत आहेत. त्याची गुणवत्ता देखील प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असते. मात्र काही दिवसांपूर्वीच एका वेगळ्या विषयाची सीरिज नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाली आहे. ज्या सीरिजचे नाव आहे मंडला मर्डर्स.**

परीक्षण

# प्रेक्षकांना खिळवून ठेवणारी वेबसीरिज - मंडला मर्डर्स




### कथानक

सीरिजचे कथानक खूपसे हॉरर आणि सस्पेन्सने भरलेले आहे. शिवाय, सीरिजच्या नावामध्येच मर्डर असल्याने अनेक मानवी हत्या देखील आहेत. एका भयानक जंगलाची ही कहाणी आहे, ज्यामध्ये एक अजब आणि विचित्र गुहा आहे, आणि या गुहेकडे एक अशी अज्ञात शक्ती आहे की, ती गावकऱ्यांच्या इच्छा आणि त्यांनी मागितलेले वरदान देऊन त्यांना संतुष्ट करते. या गुहेची शक्ती इतकी मोठी आहे की, तिच्याकडे येऊन लोक मत्यूला देखील हार मानायला लावतात. त्यामुळे गावकऱ्यांसाठी ही गुहा एखाद्या चमत्कारापेक्षा कमी नाही. या गुहेमध्ये एक वेगळे मशीन आहे. ज्या व्यक्तीला वरदान मागायचे असते, त्या व्यक्तीला त्या मशीनजवळ यावे लागते आणि त्यामध्ये पैशांचे नाणे टाकावे लागते. मात्र, पैसे टाकल्यावर त्या व्यक्तीचा आंगठा मशीनमध्ये जातो. जणू वरदान मागितल्याची आणि पूर्ण होण्याची ती किंमत वसूली आहे. हे सर्व कथानक सुरु असतानाच, दिल्लीहून गावात आलेला एक पोलीस अधिकारी आणि एक महिला पोलीस अधिकारी यांचे उपकथानक सुरु होते. दिल्लीहून आलेल्या पोलीसाची आई तो लहान असतानाच अचानक गायब झाली आहे. ती मयत पावली नसून तिला एका भूताने पळवले आहे असे तो ऐकतो आहे, आणि त्यामुळे तो आपल्या आईचा शोध घेत आहे. महिला पोलीस अधिकारी आहे, तिच्याकडे अशी एक ताकद आहे की, गुन्हेगारांना न मारताच केवळ डोक्याचा वापर करून ती मोठमोठ्या केसेस निकालापर्यंत पोहचवत आहे. दिवसातून कुठल्याही वेळी तिला मेलेली माणसे दिसत असतात. हल्ली नेटफ्लिक्सच्या बहुसंख्य सीरिजमध्ये अभिनेत्री सुरवीन चावला असतेच. तिच्याशिवाय नेटफ्लिक्स सीरिज बनवू शकत नाही का असे वाटायला लागले आहे. या सीरिजमध्ये सुरवीन चावलाने एका महिला राजकीय नेत्याची भूमिका केली आहे, आणि संपूर्ण गावावर तिचा अंकुश असल्याचे दाखवले आहे. जेष्ठ अभिनेता रघुबीर यादव या सीरिजमध्ये वेगळ्या भूमिकेत दिसतात. सावल्यांशी बोलणाऱ्या व्यक्तीची भूमिका त्यांच्या वाट्याला आली आहे. एका सकाळी त्यांना एका मरणाऱ्या व्यक्तीची सावली दिसते, आणि त्यातून कथानक पुढे सरकत जाते. अशा अनेक उपकथा आणि अनेक लहान-मोठ्या व्यक्तीरेखा प्रेक्षकांना मंडला मर्डर मध्ये पाहायला मिळतात.



### कशी आहे सीरिज ?

सीरिजचा विषय वेगळा आहे. कथा-पटकथेमध्ये राजकारण, जादूटोणा, पोलीस, हत्या आणि देव यांना एकत्र आणण्यात आले आहे. अनेक सीरिज-चित्रपट हॉरर आणि सस्पेन्स दाखवण्यासाठी अनेक वेळा कथेमध्ये भूताला दाखवण्यात येते. परंतु या सीरिजमध्ये सुपरनॅचरल गोष्टी विज्ञान-शास्त्राच्या माध्यमातून समजवण्याचा चांगला प्रयत्न करण्यात आला आहे. कथेचा विषय आणि त्यातील सस्पेन्स प्रेक्षकांना कळू नये म्हणून अनेक पात्रांचा चांगला उपयोग करून त्यांना योग्य रीतीने सादर केले आहे. पहिले सहा एपिसोडमध्ये कथा पुढे सरकताना अनेक घटना घडतात. प्रेक्षकांना त्यात गुंतवून ठेवण्यात तसेच वरदान देणाऱ्या मशीनमागे काय गुपित आहे याची जिज्ञासा निर्माण करण्यात ही सीरिज यशस्वी झाली आहे. यामध्ये अनेक हत्या देखील दाखवण्यात आल्या आहेत. तर सातव्या आणि आठव्या एपिसोडमध्ये कथा-उपकथांची उकल करण्यात आली आहे. सीरिजमधील क्लायमॅक्समध्ये दाखवलेल्या काही गोष्टी प्रेक्षकांना विचारा पलिकडे वाटू शकतात. सीरिजची सर्वात कमकुवत बाजू व व्यक्तिरेखा आहे ती वाणी कपूरची. हत्येचा शोध घेण्याची तिची पद्धत, कोण कधी आणि कसे मेले हे तिचे शोधसत्र अनेकदा बोअर करते. यामध्ये हलकेफुलके वातावरण निर्माण करण्यासाठी कुठेही विनोदी प्रसंग व व्यक्तिरेखेचा वापर करण्यात आलेला नाही. त्यामुळे खऱ्या अर्थाने ही डार्क गंभीर हॉरर सीरिज आहे असे म्हणायला हरकत नाही. शिवाय ओटीटीवर प्रदर्शित झाली असली तरी त्यात पौढ दृश्यांचा फारसा वापर केलेला नाही. फ्रेश कॉन्टेन्ट आणि चांगले लेखन असलेली ही सीरिज प्रेक्षकांना एका वेगळ्या जगामध्ये घेऊन जाते. दिग्दर्शनाच्या बाबतीत सांगायचे तर हा चांगला विषय अधिक उत्तमरित्या फुलवता आला असता.

### अभिनय

रघुबीर यादव, वाणी कपूर, वैभव राज गुप्ता, सुरवीन चावला, जमील खान, श्रिया पिळगांवकर यांच्यासारख्या कलाकारांची कामे चांगली झाली आहेत.

त्यामुळे एका वेगळ्या विषयावरील उत्सुकता निर्माण करणारी ''मंडला मर्डर्स'' पहायला हरकत नाही.

**वेबसीरिज** :मंडला मर्डर्स
**दिग्दर्शन:** गोपी पुथरन, मनन रावत
**पटकथा लेखक:** अविनाश द्विवेदी, अनुराग गोस्वामी, गोपी पुथरन, गेब गेब्रियल, मॅट ग्रॅहम, चिराग गर्ग
**कलाकार:** वाणी कपूर, वैभव राज गुप्ता, सुरवीन चावला, जमील खान, श्रिया पिळगांवकर आणि रघुबीर यादव
**ओटीटी प्लॅटफॉर्म:** नेटफ्लिक्स
**रेटिंग:** ३/५



# धनुष का झाला नाराज ?

२०१३ मध्ये दाक्षिणात्य सुपरस्टार धनुष आणि अभिनेत्री सोनम कपूर यांचा रांझणा हा चित्रपट हिंदी व तमिळ भाषांमध्ये प्रदर्शित झाला होता आणि याच चित्रपटाद्वारे धनुषने हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केले होते. आज या सिनेमाला कल्ट चित्रपट मानला जातो. परंतु या सिनेमाचे नुकतेच झालेले पुनर्प्रदर्शन वादाच्या भोवर्यामध्ये सापडले आहे. कारण या सिनेमाचे कॉपी राइट्स असलेल्या इरॉस या कंपनीने हा चित्रपट तमिळ व्हर्जनमध्ये पुनर्प्रदर्शित करताना एआय (AI) अर्थात ऑर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने या सिनेमाचा क्लायमॅक्स बदलला आहे. रांझणा प्रदर्शित झाला होता, त्यावेळी शेवटी धनुषचा मृत्यू होतो असे दाखवण्यात आले होते. परंतु त्याच्या अनेक चाहत्यांना हा दु:खी शेवट आवडला नव्हता. म्हणूनच हा सिनेमा पुन्हा प्रदर्शित करताना त्याचा शेवट बदलून धनुष जीवंत आहे असे दाखवण्यात आले आहे. ही बातमी कळल्यानंतर गेले काही दिवस अनेक लोक या गोष्टीचा विरोध करत आहेत. अशा पद्धतीने एआयचा गैरवापर करून एखाद्या सिनेमामध्ये बदल करणे ही बाब असंख्य लोकांना चिंताजनक वाटत आहे. आता खुद्द धनुषने या घटनेवर आपली नाराजी व्यक्त केली आहे. त्याने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर एक पोस्ट लिहिली आहे. त्यामध्ये त्याने लिहिले आहे की, रांझणा च्या पुनर्प्रदर्शनासाठी एआयच्या मदतीने चित्रपटाचा क्लायमॅक्स बघून मी काळजीत पडलो आहे. हा तो चित्रपट नाही, ज्यासाठी १२ वर्षांपूर्वी मी खूप मेहनत घेतली होती. असे वाटत आहे की, चित्रपटाचा आत्माच कुणी काढून घेतला आहे. मी यावर आपत्ती दर्शवल्यानंतर सुद्धा हा सिनेमा तसाच दाखवण्यात येत आहे, ही दु:खद बाब आहे. चित्रपटाचा विषय किंवा कुठल्याही गोष्टीचे एआयद्वारे परिवर्तन करणे हे नुकसानदायक आहे. आणि त्याचा खरेपणा सुद्धा संपुष्टात आणला जात आहे. सिनेमाच्या वारसा यामुळे धोक्यात सापडला आहे.


# सोनालीने का निवडला छोटा पडदा ?



अभिनेत्री सोनाली बेंद्रे सध्या 'पति पत्नी और पंगा' या रिॲलिटी टीव्ही शोचे सूत्रसंचालन करत आहे. 'हम साथ-साथ हैं' हा सिनेमा यशस्वी झाल्यानंतर सोनाली सर्वप्रथम 'क्या मस्ती क्या धूम' मध्ये टीव्हीवर दिसली होती. त्यावेळी अनेकांना या गोष्टीचे आश्चर्य वाटले होते. सोनाली रस्ता तर चुकली नाही ना? असे प्रेक्षकांना वाटले होते. त्यानंतर सुद्धा जज म्हणून अनेक रिॲलिटी शोमध्ये सोनाली सहभागी झाली. अर्थात, एके काळी मोठ्या पडद्यावर काम करणे सोनालीसाठी सहजसोपी गोष्ट नव्हती. तिच्या अनेक चाहत्यांनी सोशल मीडियाद्वारे तिला टीव्हीवर काम न करण्याचा सल्ला दिला, तर अनेकांना तिच्यावर टीका देखील केली. चित्रपटांमध्ये यशस्वी होऊन सुद्धा आपण टेलिव्हिजन माध्यम का निवडले याचे कारण नुकतेच सोनालीने सांगितले आहे. ती म्हणाली की, सर्वांना असे वाटत होते की, मी रस्ता चुकले आहे. कारण टीव्ही हे माध्यम तेव्हा लहान मानले जात होते. परंतु 'क्या मस्ती क्या धूम' हा शो खरोखरच चांगला शो होता. मला त्याचा विषय आवडल्यामुळे मी तो स्वीकारला आणि त्याचे मानधन सुद्धा मला चांगले मिळत होते. याचा अर्थ हा आहे की, चांगले पैसे मिळत असल्यानेच सोनालीने टीव्हीवर काम करण्याचा निर्णय घेतला. टीव्हीवर काम करणे चुकीचे नाही, परंतु पैशांसाठी सोनाली बेंद्रे सध्या बदनाम व वादग्रस्त मुनव्वर फारुकीसह 'पति पत्नी और पंगा' या शोचे सूत्रसंचालन करत आहे, हे तिच्या चाहत्यांना आवडेल का? हा विचार सोनालीने करायला हवा.

# अभिनय न करताच कोटी रुपये अक्षयच्या खिशात...

खिलाडी अक्षय कुमार आपल्या सिनेमांसाठी नेहमीच चर्चेत असतो. यावर्षातील गेल्या सहा महिन्यांमध्ये त्याचे तीन चित्रपट प्रदर्शित झाले असून त्याचे बरेच चित्रपट प्रदर्शनाच्या वाटेवर आहेत. मात्र, त्याच्या या प्रदर्शित चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर फार मोठी कमाई केलेली नाही. गेल्या काही काळात अक्षयला चित्रपटांच्या अपयशाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे त्याला एका यशस्वी, सुपरहिट चित्रपटाची नितांत गरज आहे. असे असले तरी अक्षयने यावर्षी तब्बल ११० कोटी रुपयांची कमाई केली आहे. तीही अभिनय न करता. आता अभिनय न करता कलाकार कसा कमाई करणार, असा



प्रश्न तुमच्या मनामध्ये आला असेल. परंतु अक्षयने गेल्या सात महिन्यांमध्ये आपली मालमत्ता विकून ११० कोटी कमावले आहेत. इंडेक्स टॅपच्या कागदपत्रांच्या हवाल्याने सांगायचे तर, ओबेरॉय थ्री सिक्सटी वेस्ट प्रोजेक्टमध्ये आपला वरळीतील अपार्टमेंट अक्षय आणि त्याची पत्नी ट्विंकलने ८० कोटींना विकले आहे. तसेच बोरिवली येथील ओबेरॉय स्काय सिटीमधील आपला ३ बेडरूम असलेला फ्लॅट अक्षयने चार कोटी पंचवीस लाखांना विकला आहे, आणि याच सोसायटीमधील आणखी एक फ्लॅट त्याने चार कोटी पस्तीस लाख रुपयांना विकला. त्याचप्रमाणे, बोरिवली पूर्व येथील आपल्या तीन फ्लॅट्स त्याने प्रत्येकी ७ कोटी १० लाख, सहा कोटी साठ लाख आणि पाच कोटी पस्तीस लाखांना विकले आहेत, तसेच एक लहान फ्लॅट एक कोटी पस्तीस लाखांना विकला आहे. अक्षयने नुकतेच लोअर परेल येथील लोढा कॉम्प्लेक्समधील आपले ऑफिस आठ कोटींना विकले आहे.




# नवऱ्यामुळे केस पांढरे...


अभिनेत्री रत्ना पाठक शाह यांनी आपल्या चित्रपट आणि टीव्ही कारकिर्दीत अनेक चांगले चित्रपट आणि मालिका दिल्या आहेत. अनेक प्रेक्षक त्यांच्या सहजसुंदर अभिनयाचे चाहते आहेत. सद्य जमान्यात चित्रपटसृष्टीमध्ये महिला कलाकारांना त्यांच्या लूकवर विशेष लक्ष द्यावे लागते. त्यासाठी त्यांना महागड्या ट्रीटमेंट्स द्यावे लागतात आणि आपले खरे वय लपवण्याचा प्रयत्न करावा लागतो. परंतु गेल्या काही काळापासून रत्ना पाठक चित्रपटांमध्ये सफेद केसांमध्ये दिसत आहेत, आणि ही गोष्ट त्यांच्या अनेक चाहत्यांना आवडत नाही. त्यांचे मत आहे की, त्या वयाच्या मानाने अधिक पौढ दिसतात. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये रत्ना पाठक शाह यांनी आपल्या सफेद केसांविषयी खुलासा केला. त्यांनी सांगितले की, मी केस डाय करणे बंद केले, परंतु माझ्या सफेद केसांचा परिणाम माझ्या कारकिर्दीवर झाला. रत्ना पाठक मजेत म्हणतात की, मी आता नानी-दादीच्या भूमिकांच्या श्रेणीमध्ये आले आहे. आता कोणता हिरो माझ्यासह काम करणार? मी कुणाची आई म्हणून शोभू शकते? पण माझे मत आहे की, कलाकाराला आपले वय स्वीकारणे ही सहज सोपी गोष्ट नसते. परंतु एका ठराविक काळानंतर त्यांना या गोष्टीचा स्वीकार करावाच लागतो. किती काळ ते आपले वय लपवणार? कलाकार जितका वय लपवायचा प्रयत्न करतो, तितका तो मूर्ख दिसतो. मी केस न रंगवण्यामागे माझे पती नसीरुद्दीन शाह यांचा हात आहे. त्यांनी मला सांगितले की, 'तू आता केस रंगवणे बंद कर.' आणि मी सूटकेचा श्वास घेतला. पण त्यामुळे मला काम मिळणे कमी झाले. माझ्याकडे चित्रपटांच्या ऑफर्स येणे कमी झाले, कारण माझ्यासमोर जे कलाकार काम करत होते, ते आपले केस अद्याप डाय करत आहेत.

# किती पैसे मिळणार शाहरुखला ?



गेली ३३ वर्षे चित्रपटसृष्टीमध्ये काम करणाऱ्या शाहरुख खानला जवान या चित्रपटातील अभिनयासाठी नुकताच सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. हा त्याचा पहिला राष्ट्रीय पुरस्कार आहे. त्याच्यासोबत विक्रांत मॅसीला हा पुरस्कार मिळाला, तर राणी मुखर्जीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. शाहरुख खानवर सध्या शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्याच्या असंख्य चाहत्यांबरोबरच दाक्षिणात्य सुपरस्टार मोहनलाल आणि अल्लू अर्जुन, 'राज'ची सिमरन उर्फ काजोल, अजय देवगण, संगीतकार ए.आर. रेहमान, अनन्या पांडे, सान्या मल्होत्रा यासह अनेक सेलिब्रिटींनी शाहरुखचे अभिनंदन केले आहे. हा पुरस्कार जिंकणे ही इतकी सन्मानाची गोष्ट असते की त्यापुढे पुरस्कारासाठी मिळणार्या रक्कमेचे काय मोल? तरीही अभिनयाचा पुरस्कार जिंकणाऱ्या कलाकाराला भारत सरकारद्वारे किती रक्कम मिळते याचा अंदाज वाचकांना यावा यासाठी ही माहिती शेअर करत आहोत. या पुरस्काराच्या अंतर्गत शाहरुख खान, विक्रांत मॅसी आणि राणी मुखर्जी यांसारख्या कलाकारांना रजत कमळ पुरस्कार दिला जाणार असून त्यांना पदक आणि मानपत्रासोबत २ लाख रुपये मिळतील.

# नवाकाळ शब्दकोडे-१३३३



**आडवे शब्द –**

२. मैत्री, स्नेह ३. आशिष ६. नाव ८. उत्पन्न ११. वेलींचा मांडव १३. निर्मळ १४. अभ्यंग करताना अंगाला लावण्याचे सुगंधी द्रव्य १७. बांबूची मोठी टोपली १८. जगाची रीत २०. पवित्र २१. भपकेबाज, नट्टापट्टा करणारी २४. मनाची घालमेल २६. प्रत्येक २८. याग ३०. ध्वनी ३१. वाया, व्यर्थ ३२. हसू ३३. जलप्रवासाचे मोठे वाहन, गलबत ३५. समीक्षा ३७. तृतीया ४०. मोक्ष ४२. वितरण ४४. धुंदीत असलेला ४५. बांधकामासाठीचे एक लाकूड ४७. सातू ४८. लहान ४९. जलद हालचाली करणारा ५१. नाचणी, वरीसारखी हलकी तृणधान्ये ५३. मासेमारीचा हूक ५५. वस्तू, जिन्नस ५६. सरोवरातील हाउसबोट ५७. गर्दन ५८. आढेवेढे घेणे ६०. भ्रमरी ६२. योगदान ६४. विष्णूचे एक नाव ६७. भाजीपाला वगैरेत आढळणारा कीटक ६९. धंदा, उदीम ७०. लकेर ७१. विश्व ७२. फस्त ७३. कळस, शिखर ७४. मुलांच्या कंबरेला बांधायचा रेशमी अथवा चांदी-सोन्याचा दोरा किंवा गोफ, कडदोरा ७६. चूक, प्रमाद ७८. करवंटी ७९. देवलोक ८१. पहाट ८२. भिक्षेकरी, भिकारी ८३. सुकुमार, नाजूक ८५. व्यास ऋषींचे मूळ नाव ८९. देह, काया ९०. घरात वापरण्यासाठी चपला ९१. शीण ९३. प्रतिकूल काळ ९८. ख्रिस्ती धर्मीयांचा सण ९९. टोचणी १००. पाणी १०१. वारेमाप उपलब्धता १०४. सूड, उट्टे १०५. गाढव १०६. निमंत्रितांना दिलेला खाना १०८. मित्र, दोस्त ११०. काळजीत पडलेला ११३. दिनांक ११४. नियमितता ११५. किरकोळ प्रकारची जखम ११६. सजीव-निर्जीव सृष्टी

**उभे शब्द –**

१. आई, जननी २. जागरूक ३. फोडणीचे वरण ४. चारित्र्य ५. दीन, केविलवाणा ६. घ्राणेंद्रिय ७. मालिश ९. राजवाडा १०. खड्डा ११. कृतक, वरवरचा १२. गज, हत्ती १३. प्रवास, फिरणे, भ्रमण १५. जखमेतून वाहणारे रक्त १६. देवाच्या मूर्तीभोवतीची आरास १९. गूढ, न समजणारे २२. सत्ताविसावे नक्षत्र २३. मोकळा, प्रांजळ स्वभाव २५. खट्याळ २७. घळ, गुंफा २९. अभिनेत्री ३२. पुष्पमाला ३३. बस्तान, स्थैर्य ३४. भारतीय सैनिक; तरुण व्यक्ती ३६. पाषाण ३८. विष ३९. आडदांड व उर्मट ४०. पक्ष्यांचे पीस ४१. लगबग, धांदल ४३. फजिती ४६. ताकद ४८. अर्थपूर्णता ५०. पाडाव, अपयश ५१. निसर्गसौंदर्य ५२. कट्टर ५४. प्रतिबंध, अटकाव ५६. दगड ५८. ही एका हाताने वाजू शकत नाही. ५९. वाह्यात, वांड ६१. बुद्धी, अक्कल ६३. रसदार, मधुर ६५. धुके ६६. गोखरू, गोक्षुर ६७. भगवान दत्तात्रेयांची आई ६८. खोडी, कुरापत ६९. वेदना, दुःख ७०. दह्यापासून बनवलेले एक पेय ७२. विपुलता ७३. रस्ता ७४. अर्क, काढा ७५. सैन्याचा तळ, गट ७७. रचना करणारा, निर्माता ७८अ. वस्त्र ७९. गाण्यातील सूर ८०. गर्मी, गरम हवा ८१. व्रतवैकल्ये ८४. रस्ता ८५. कृपा करणारा, देव ८६. स्त्रियांचा नाकातला दागिना ८७. प्रश्न ८८. कचेरीतल्या कामकाजात राखली जाणारी गुप्तता ८९. मुक्काम, बूड ९२. लाकूड खाणारा कीटक ९४. भय, धास्ती ९५. अंतःकरण ९७. सुगंधी मूळ असणारी वनस्पती ९८. नृत्य १०१. चौदा ओळींचा काव्यप्रकार १०२. पुत्र १०३. जाड रेशमी कापड १०५. धोका १०६. खुंटी १०७. तुळईला आधार देणारा खांब १०९. खोबण, फट १११. स्वयंपाकात वापरले जाणारे आंबट फळ ११२. शर्विलक •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३३२चे उत्तर**

**आडवे शब्द :** ३. स्वामित्व ५. नस ७. पावशा १०. इकडची स्वारी १३. रामभरोसे १५. नेहमी १७. कबर १९. विषमता २१. पोक २३. चवळी २४. चुरस २६. धीट २७. नार २८. काकडआरती ३०. रेडा ३१. दुजा ३२. कामना ३४. कांता ३५. कीटक ३६. मेघ ३७. झोप ३८. कवठ ४०. वन्ही ४१. साथी ४३. योद्धा ४४. डाव ४५. उणे ४६. कलकल ४८. अनुराग ५१. पागडी ५२. मढ ५४. शान ५५. सावकार ५६. सफल ५७. गुलछडी ५९. द्वारका ६०. खराब ६२. मशाल ६३. मानखंडना ६६. बक ६७. शैल ६८. छत ६९. रास्त ७०. पलिता ७२. अंत्य ७३. तंबू ७५. रमणीय ७८. आरसा ८०. जंगी ८१. कनात ८२. क्षय ८३. आजी ८४. बांबू ८५. खेचर ८७. क्रोध ८८. तळीराम ९०. कडकडाट ९२. सरकारी ९४. नजर ९६. मसूर ९८. चरवी १००. डास १०२. राणीव १०४. लव १०५. आळवणी १०६. डबीर १०७. भरवसा १०८. सूत

**उभे शब्द :** १. लकब २. गोची ३. स्वारी ४. त्वरा ५. नभ ६. सरोवर ८. वनौषधी ९. सह १०. इकडे ११. डरपोक १२. स्वास्थ्य १४. मल्ल १५. नेता १६. मीटर १८. भोवती २०. मटकावणे २२. कडकी २३. चरक २४. चुडा २५. सदुपयोग २७. नाना २८. कातावणे २९. आटवल ३०. रेघ ३३. मठ ३६. मेथी ३९. कवडीचुंबक ४१. साल ४२. अनुशासन ४४. डाग ४५. उपसर्ग ४६. कढ ४७. कमाल ४९. रान ५०. टवका ५१. पारख ५२. मलमल ५३. गोडी ५५. सारनाथ ५७. गुलछबू ५८. छडा ५९. द्वाड ६१. राबता ६३. मास्तर ६४. खंडणी ६५. कोपरखळी ६७. शैत्य ७१. लिसा ७२. अंध ७३. तंगी ७४. बनारस ७६. मख्ख ७७. यक्षधन ७९. रुंजी ८०. जंबूक ८१. कच ८३. आमसूल ८४. बांडगूळ ८५. खेटर ८६. झकास ८८. तरणी ८९. राम ९१. डाचणी ९३. रडार ९५. जरासा ९७. रवण ९९. वीड १०१. भार १०३. वसू

# ज्येष्ठ अभिनेत्री सुलभा देशपांडे

**सुलभा देशपांडे या माहेरच्या सुलभा कामेरकर. मुंबईतच लहानाच्या मोठ्या झालेल्या सुलभा देशपांडे यांनी सिद्धार्थ महाविद्यालयातून आपले शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर शिक्षिका म्हणून छबिलदास हायस्कूलमध्ये कारकीर्दीची सुरुवात करणाऱ्या सुलभाताईंचे रंगभूमीशी इतक्या सहजतने धागे जुळले की पुढे याच छबिलदास हायस्कूलमध्ये 'अविष्कार'च्या रुपाने त्यांनी नाट्यचळवळीचे कार्य उभारले. शांतता कोर्ट चालू आहे, या विजय तेंडुलकर यांच्या नाटकातील लीला बेणारे या शिक्षिकेची त्यांची भूमिका अतिशय गाजली. या व्यक्तिरेखेने त्यांच्या अभिनयाची ताकद पहिल्यांदा जगाला दाखवून दिली. याच नाटकावर याच नावाचा चित्रपटही आला आणि त्याचीही रसिकांनी दखल घेतली.**



'जैत रे जैत', 'चौकट राजा', 'विहीर', 'हापूस' या चित्रपटांतील त्यांच्या भूमिकाही गाजल्या. 'रेनेसाँ'च्या काळात समाजजीवन ढवळून निघाले असताना त्याचे परिणाम नाट्य-चित्रपट क्षेत्रावरही तितक्याच वेगाने झाले. विजय तेंडुलकरांनी मुलांसाठी नाटक लिहायला सांगितले म्हणून सुलभाताई लिहित्या झाल्या. त्यांचा रंगभूमीशी संबंध आला तेव्हा नवविचाराचे वारे 'रंगायन'च्या निमित्ताने उभे राहिले होते. विजयाबाई मेहता यांनी स्थापन केलेल्या या 'रंगायन'च्या प्रवाहात त्या सामील झाल्या. आणि मग त्याच 'रंगायन'चे बोट पकडून प्रायोगिक रंगभूमीवर निष्ठेने काम करता करता तिथून बाहेर पडून १९७१ साली पती अरविंद देशपांडे यांच्या बरोबरीने त्यांनी 'अविष्कार'ची सुरूवात केली. पहिल्यांदा छबिलदास शाळेच्या सभागृहात मुहूर्तमेढ झालेली या 'अविष्कार'ची नाट्यचळवळ त्यांनी शेवटपर्यंत सुरूच ठेवली.रंगभूमीपुरती आपली अभिनयकला मर्यादित न ठेवता त्याच वेळी हिंदीत जो समांतर चित्रपटांचा प्रवाह सुरू झाला होता त्यातही सुलभाताई तितक्याच उत्साहाने सामील झाल्या. ७३ हून अधिक हिंदी सिनेमांमध्ये त्यांनी अभिनय केला होता. 'भूमिका', 'अरविंद देसाई की अजब दास्ता', 'गमन', 'अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यू आता है', 'विजेता', 'भीगी पलके', 'इजाजत', 'विरासत' 'आदमी खिलौना है', 'गुलाम-ए-मुस्तफा' हे त्यांचे चित्रपट गाजले. 'कोंडुरा' या



हिंदी तसेच तेलुगू चित्रपटातही त्यांनी भूमिका केली होती. 'राजा रानी को चाहीए पसीना' हा त्यांनी दिग्दर्शित केलेला बालचित्रपट गाजला होता. 'चौकट राजा', 'जैत रे जैत', सारख्या मराठी चित्रपटांमधून त्यांचा अभिनय गाजला होता. त्यांनी अनेक हिंदी व मराठी दूरचित्रवाणी मालिकांतही काम केले होते. काही वर्षांपूर्वी हिंदीत 'सोनी' वाहिनीवरील 'केहता है दिल जी ले जरा' या मालिकेतून त्यांनी अशीच एक छान आजी रंगवली होती. त्यावेळी मराठी चित्रपट आणि मालिकांमधून चांगली भूमिका आपल्या वाट्याला येत नाही, अशी तक्रोर त्यांनी केली होती. मात्र 'झी मराठी' वाहिनीवरील 'अस्मिता' मालिकेमुळे त्यांची तीही इच्छा पूर्ण झाली. १९८७ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले होते. डॉ. श्रीराम लागू यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या तन्वीर पुरस्काराने २०१० साली त्यांच्या रंगभूमीच्या सेवेचा गौरव करण्यात आला. 'इंग्लिश विंग्लिश' हा त्यांची भूमिका असलेला अखेरचा हिंदी चित्रपट व 'इन्व्हेस्टमेंट' हा त्यांचा शेवटचा मराठी चित्रपट ठरला. अभिनेत्री अदिती देशपांडे या सुलभा देशपांडे यांच्या स्नुषा होत. सुलभा देशपांडे यांचे ४ जून २०१६ रोजी निधन झाले.

# ऑपरेशन महादेवमध्ये ठार झालेले पहलगामचे हल्लेखोर पाकिस्तानीच

पान १ वरून

संबंधित तीन दहशतवादी २८ जुलै रोजी ऑपरेशन महादेवमध्ये ठार झाले. त्यांच्या तपासात पाकिस्तानच्या नॅशनल डेटाबेस अँड रजिस्ट्रेशन ऑथॉरिटी (एनएडीआरए)च्या बायोमेट्रिक नोंदी, पाकिस्तानी मतदार ओळखपत्रांच्या प्रती आणि सॅटेलाईट फोनवरील डिजिटल डेटा, लॉग्ज व जीपीएस लोकेशन याद्वारे हल्लेखोरांची ओळख निश्चित करण्यात आली. या दहशतवाद्यांकडून पाकिस्तान निवडणूक आयोगाने दिलेली मतदार ओळखपत्रे (लॅमिनेटेड स्लिप्स) आणि शस्त्रास्त्रे हस्तगत करण्यात आली. तपासात मिळालेली गोळीबार नोंद, बॅलिस्टिक चाचणी अहवाल व अटक केलेल्या दोन काश्मिरी साथीदारांच्या जबाबांमुळे या दहशतवाद्यांचा पहलगाम हल्ल्यात थेट सहभाग असल्याचे स्पष्ट झाले. कँडीलँड आणि चोकोमॅक्स या पाकिस्तानी ब्रँड्सच्या चॉकलेट्सचे रॅपर मे २०२४ मध्ये मुझफ्फराबाद येथे पाठवलेल्या एका खेपेशी संबंधित आहे. फॉरेन्सिक तपासणीनुसार दहशतवाद्यांनी प्रतिहल्ला करताना वापरलेली एके-१०३ रायफल पहलगाम हल्ल्यातही वापरलेली असल्याचे सिद्ध झाले आहे. डीएनए चाचणीतील पहलगाम हल्ल्याशी संबंधित दहशतवाद्यांच्या नमुन्यांशी ती जुळत आहे. हल्ल्यापूर्वी हे तिघे उत्तर काश्मीरमधील गुरेझ सेक्टरमधून नियंत्रण रेषा ओलांडून भारतात शिरले. २१ एप्रिल रोजी त्यांनी बैसरनपासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या हिल पार्कमधील एका तात्पुरत्या झोपडीत त्यांनी आसरा घेतला होता. त्यांना स्थानिक काश्मिरी असलेल्या परवेज आणि बशीर अहमद जोठार या दोघांनी आसरा दिला. त्या दोघांनी दहशतवाद्यांना एक रात्र जेवण पुरवले. दुसऱ्या दिवशी २२ एप्रिल रोजी त्यांनी पहलगाम येथील पर्यटकांवर गोळीबार केला.

# ओबीसी आरक्षणाला मान्यता! नवी प्रभाग रचनेनुसार निवडणूक

पान १ वरून

२७ टक्के ओबीसी आरक्षणानुसारच निवडणुका घेण्यात याव्यात.

न्यायालयाच्या या निर्णयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केले आहे. ते म्हणाले की, या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२२ च्या प्रभाग रचनेनुसार नव्हे तर २०१७ च्या प्रभाग रचनेनुसार होणार हे आता स्पष्ट झाले आहे. याशिवाय राज्यातील सर्व जिल्ह्यांत ओबीसी आरक्षण लागू होणार आहे. अन्न व नागरी पुरवाठा मंत्री आणि ओबीसी नेते छगन भुजबळ यांनीही या निकालाचे स्वागत करत म्हटले की, आता सगळ्या याचिका निकाली निघाल्या आहेत. पूर्णपणे आरक्षणानुसार आणि सरकारच्या अधिपत्याखाली प्रभाग रचनेनुसार निवडणुका होणार आहेत.

# झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे निधन

पान १ वरून

पहिल्यांदा घेतली. बहुमत सिद्ध न झाल्यामुळे केवळ १० दिवसच ते मुख्यमंत्रिपदी राहिले. त्यानंतर ऑगस्ट २००८ ते जानेवारी २००९ असे ४ महिने २२ दिवस आणि डिसेंबर २००९ ते मे २०१० असे ५ महिने असे ते या पदावर होते. झारखंडमधील राजकीय अस्थिरतेमुळे त्यांना मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ एकदाही पूर्ण करता आला नाही. २००४ ते २००६ या काळात तीनवेळा ते केंद्रिय कोळसा मंत्री होते. १९८० ते २००५ या काळात ते सहा वेळा लोकसभेचे खासदार होते. याशिवाय तीन वेळा राज्यसभेवरही निवडून गेले होते.

शिबू सोरेन यांच्यावर १९७५ च्या चिरूडीह हत्याकांड आणि १९९४ मध्ये त्यांच्या खासगी सचिवाच्या हत्या प्रकरणात आरोपी होते. या दोन्ही प्रकरणात नंतर त्यांना निर्दोष ठरवले. त्यांच्या नावावर बेहिशेबी संपत्ती जमा केल्याचेही आरोप झाले होते. १९९३ मध्ये नरसिंह राव यांच्या सरकारविरोधातील अविश्वास प्रस्तावावेळी लाच घेऊन सरकार वाचवल्याचा आरोप त्यांच्यावर झाला होता.

**PUBLIC NOTICE**

Shri. Rohan Govind Kokani, S/o late Smt. Jyoti Suryvanshi was sole owner of Flat No. A/09 in ADIWASI GRIHA NIRMAN SAHAKARI SOCIETY LTD. (GIRIKUNJ) lying and situated at Plot No. 40, 41, 42, Linking Road, Extension, Santacruz (West), Mumbai - 400054, died on 23.11.2024.

The society hereby invites claims or objections from the heir or heirs or other claimant or claimants to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/property of the society within a period of 15 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society in such manner as is provided under the bye-laws of the society. The claims/objections if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants/objectors, with the Society Office between office hours Time: 11:00 A.M to 1:00 P.M. from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

**Date: 05/08/2025**
**Place: Mumbai**

**For and on behalf of**
**Adiwasi Griha Nirman Sahakari Society Ltd. (Girikunj)**

**Hon. Chairman Hon. Secretary**

**PUBLIC NOTICE**

As per the instructions given by **Mr. Ptabhat Jain** R/at- Vidisha Madhya Pradesh-464001. That **Mr. Ptabhat Jain** has purchased 1)Office No.c 44, adm. 275 Sq Ft ie 25.55 Sq. Mtrs Built up.2) Office No.c 45, adm. 275 Sq Ft ie 25.55 Sq. Mtrs Built up 3)Office No.c 46 and Office No.c 47 adm. 360 Sq Ft ie 33.45 Sq. Mtrs Built up on the first floor **which is lying in "ASHOKANAGAR C Type CO-OP HSG. SOCIETY LTD."** which is situated and constructed on the land bearing 1) Survey No. 43, Hissa No. 1+2/1/1,to Survey No. 43, Hissa No. 1+2/1/7, situated at village Kharadi, Taluka Haveli, Dist. - Pune within the local limits of Pune Municipal Corporation, and also within the Jurisdiction of Sub-registrar Haveli No. I to XXVII., by registered agreement to sale/sale Deed 1) dated -9/10/2001 which are registered in the office of Sub-Registrar Haveli No. 7 Pune at serial nos 2998/2001,2999/2001,3000/2001 respectively dated 9/10/2001. 2) agreement to sale/sale Deed dated 15/11/2007 which are registered in the office of Sub-Registrar Haveli No. 7 Pune at serial nos 8497/2007, 8498/2007, 8499/2007 respectively dated 15/11/2007 3). agreement to sale/sale Deed dated 19/09/2007 which are registered in the office of Sub-Registrar Haveli No. 11 Pune at serial nos 8033/2007,8034/2007,8035/2007 respectively dated 19/09/2007 4) agreement to sale/sale Deed dated 29/10/2007 which are registered in the office of Sub-Registrar Haveli 8031/2007,8032/2007,8033/2007 respectively dated 29/10/2007 5) agreement to No. 7 Pune at serial nos sale/sale Deed dated 21/11/2007 which is registered in the office of Sub-Registrar Haveli No. 8 Pune at serial no 9716/2007 dated 21/11/2007 6) agreement to sale/sale Deed dated 16/09/2010 which is registered in the office of Sub-Registrar Haveli No.7 Pune at serial no 7883/2010 dated 16/09/2010 5) agreement to sale/sale Deed dated 18/03/2023 which is registered in the office of Sub-Registrar Haveli No. 7 Pune at serial no 6421/2023 dated 18/03/2023

That the Original copy of all the above documents and Index 2 has been lost/misplaced and inspite of reasonable search could not find the said documents. It is hereby inform and request to the public at large that if any person found the said original Documents, handover the same on the following address of Advocate within 7 days (seven days) from the publication of this notice.

**Date: 05/08/2025**

**ADV. DATTATRAY N. KALE**
**(B.S.L., L.L.B.) ADVOCATE**
OFF- Sr.No. 49/2, Pathare Complex, Chandannagar, Pune - 14.

**जाहीर नोटीस/समन्स**

**मे.तहसिलदारसो व शेतजमीन न्यायाधिकरण, इस्लामपूर**
यांचे कोर्टात
क्र.टेनन्सी/३२ग एस आर/२०/२०२२

श्री. एकनाथ पाटील वगैरे — अर्जदार
विरुध्द
श्री. विठ्ठल पाटील वगैरे — जाबदार

मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ३२ ग अन्वये मौजे कासेगांव, ता.वाळवा, जि.सांगली येथील जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

| अ.नं. | गावाचे नाव | गट नंबर | क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. | हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १) | कासेगांव | १०८ | ०,०६,१० | १.६२ | संपुर्ण |

येणे प्रमाणे झाड-झुडपे तदंगभुत वस्तु व सर्व हक्कांसह मिळकतीचे वर्णन असे. सदर मिळकतीची मुंबई कुळवहिवाट अधिनियम कलम ३२ ग प्रमाणे किंमत ठरवून अर्जदार यांचे नांवे कलम ३२ एम प्रमाणे सर्टिफिकेट मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याकामी जाबदार नं. १ब) रेखा संजय देशमुख, १ड१) सुनिता सुनिल पाटील, नं. १ड२) अजिंक्य सुनिल पाटील, १ड३) शुभम सुनिल पाटील रा. स्वारगेट पुणे व नेहरू नगर, मुंबई यांना मे. कोर्टामार्फत नोटीसा काढणेत आलेली होती. परंतु सदर जाबदार नं. १) रेखा संजय देशमुख, १ड१) सुनिता सुनिल पाटील, नं. १ड२) अजिंक्य सुनिल पाटील, १ड३) शुभम सुनिल पाटील यांचा अर्जात दिलेल्या पत्त्यावर रजिष्टर पोस्टाने नोटीस पाठविली असता 'त्यांचा आढळ झाला नाही अहवाल दाखल' या कारणास्तव शेरा मारून नोटीस न बजावता परत आलेल्या आहेत.

सदर कामातील वर नमुद जाबदार यांना एक संधी मिळावी म्हणून खालील नमूद पत्त्यावर जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

जाबदार नं.
**१ब) रेखा संजय देशमुख,**
**रा. पोलीस लाईन, घोरपडे पेठ, स्वारगेट, पुणे**
**१ड१) सुनिता सुनिल पाटील**
**१ड२) अजिंक्य सुनिल पाटील**
**१ड३) शुभम सुनिल पाटील**
**१ड ते १ड३) रा. नेहरू नगर, अभ्युदय बँक, कुर्ला, मुंबई**

त्या अर्थी या जाहीर समन्सने कळविणेत येते की, सदरचे जाहीर समन्स प्रसिध्द झालेपासुन एक महिन्यांच्या आत अगर नेमली तारीख १९/०८/२०२५ रोजी दु. ३.०० वा. तहसील कार्यालय वाळवा इस्लामपूर या कोर्टात स्वतः, वारस, अगर आपले प्रतिनिधी/वकिल अगर हितसंबंधित व्यक्ती यांचेमार्फत लेखी अथवा तोंडी पुराव्यासह हजर रहावे आपूण तसे न केलेस अर्जदार यांचे मागणी प्रमाणे सदर अर्जाचा एकतर्फी निर्णय करणेत येईल नंतर कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. म्हणून हे जाहीर समन्स आज रोजी माझे सही-शिक्क्यानिशी असे.

**ठिकाणः इस्लामपूर**
**दि.१४/०७/२०२५**

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, वाळया-इस्लामपूर**

**फॉर्म बी**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)

**पाईलटेक इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **पाईलटेक इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड** |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | ०४.०७.२०१६ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी - मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/मर्यादित दायित्व ओळख क्र. | U45309MH2016PTC283208 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | १०६, सीटीएस १६२२, विलिंग्टन बिझनेस पार्क, एके रोड, अंधेरी पूर्व, होंडा शोरुमसमोर, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०० ०५९. |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | ३०.०७.२०२५ |
| ७. | कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरु होण्याचा दिनांक | एनसीएलटी आदेश दिनांक ३१.०७.२०२५ |
| ८ | परिसमापक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता | श्री. एस. गोपालक्रिष्णन (IBBI/IPA-002/IP-N00151/2017-18/10398) |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः २०३, दि घाटकोपर नीळकंठ सीएचएस, जेठाभाई लेन, घाटकोपर पूर्व, मुंबई - ४०००७७. ईमेल : gopi63.ip@gmail.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः २०३, दि घाटकोपर नीळकंठ सीएचएस, जेठाभाई लेन, घाटकोपर पूर्व, मुंबई - ४०००७७. ईमेल : gopi63.ip@gmail.com liq.piletechinfra@gmail.com |
| ११ | दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक | ३०.०८.२०२५ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी दि. ३१.०७.२०२५ रोजी **पाईलटेक इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड**चे परिसमापन सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.

**पाईलटेक इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांना याद्वारे त्यांचे दावे दि. ३०.०८.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापकाकडे बाब क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.**

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**


**दिनांक: ०५.०८.२०२५**
**ठिकाण: मुंबई**

**एस. गोपालक्रिष्णन**
**दिवाळखोरी व्यावसायिक**
**आयबीबीआय नोंदणी क्र.:** IBBI/IPA-002/IP-N00151/2017-18/10398
**एएफए वैधता:** दि. ३१ डिसेंबर, २०२५ **पर्यंत**
**पत्ता:** २०३, दि घाटकोपर नीळकंठ सीएचएस, जेठाभाई लेन, घाटकोपर पूर्व, मुंबई - ४०००७७.

नवाकाळ

• पुणे | मंगळवार ५ ऑगस्ट, २०२५ • पान -८

# एआयमुळे ८० टक्के नोकऱ्या धोक्यात! उद्योगपतींचा इशारा



**नवी दिल्ली -** संगणक निर्मिती क्षेत्रातील भारतीय वंशाचे अमेरिकन अब्जाधीश उद्योगपती विनोद खोसला यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानामुळे भविष्यात उद्भवणाऱ्या धोक्यांबद्दल मोठे वक्तव्य केले. पुढील पाच वर्षांत एआयमुळे सुमारे ८० टक्के नोकऱ्या धोक्यात येतील, असा इशारा त्यांनी दिला आहे. खोसला हे सन मायक्रोसिस्टम्स या कंपनीचे सह-संस्थापक तर खोसला व्हेंचर्सचे संस्थापक आहेत. एका युट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत खोसला म्हणाले की, एआय पुढील पाच वर्षांत जवळजवळ ८० टक्के नोकऱ्या नष्ट करेल. मात्र त्याचवेळी तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात रोजगाराच्या नव्या संधीही एआयमुळे निर्माण होतील. या नोकऱ्या आपल्या कल्पनेपलिकडच्या असतील. २०४० पर्यंत अशी परिस्थिती निर्माण होईल की, त्यावेळी लोकांना पोट भरण्यासाठी काम करण्याची गरजच भासणार नाही. त्यावेळी लोक उदरनिर्वाहासाठी नव्हे तर केवळ हौस म्हणून काम करतील.

## गणेश आगमन २०२५



धारावीचा सुखहर्ता



फोर्टचा राजा



कोल्हापूरचा चिंतामणी



मुंबादेवीचा महाराजा (सर्व छाया: दीपक साळवी)

## सरपंच देशमुख हत्या प्रकरण! पुढील सुनावणी १८ ऑगस्टला

■ बीड

**सरपंच** संतोष देशमुख हत्या प्रकरणात पुढील सुनावणी १८ ऑगस्टला होणार आहे. आज झालेल्या सुनावणीला विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम अनुपस्थित होते, तर विशेष सहाय्यक सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे न्यायालयात हजर होते. या सुनावणीत आरोपी वाल्मिक कराडच्या मालमत्ता जप्ती संदर्भातील अर्जावर चर्चा झाली. मात्र अद्याप याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. तसेच कराडने दाखल केलेल्या जामीन अर्जावरही निर्णय लांबणीवर पडला असून, त्यावर १८ ऑगस्टला निकाल लागण्याची शक्यता आहे.

याबाबत वाल्मिक कराडचे वकील विकास खाडे म्हणाले की, आजची सुनावणी मुख्यत्वे कराडच्या जामीन अर्ज आणि आरोपी क्रमांक दोन विष्णू चाटे यांच्यासह इतर आरोपींच्या दोषमुक्ती अर्जावर युक्तिवादासाठी होती. आम्ही जामीन अर्जावर युक्तिवादासाठी तयार होतो. मात्र सरकारी पक्षातर्फे मुदत मागितल्यामुळे न्यायालयाने पुढील सुनावणीसाठी १८ ऑगस्ट तारीख निश्चित झाली आहे.

## ठाण्यात केमिकल टँकरला आग

**ठाणे-** ठाण्याहून गुजरातच्या दिशेने जात असलेल्या एका केमिकल टँकरला अचानक आग लागली. आग लागल्यानंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले. महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. टँकरमध्ये ज्वलनशील रसायने असल्यामुळे आगीचा भडका उडण्याची शक्यता होती. आग आटोक्यात आणण्यास उशीर झाल्यास मोठ्या प्रमाणावर जीवितहानी आणि मालहानी होण्याचा धोका होता. मात्र, अग्निशमन दलाने तत्काळ कारवाई करत आग विझवली.

## पनवेल डान्सबार तोडफोड प्रकरण मनसेच्या ८ कार्यकर्त्यांना जामीन

### पनवेल न्यायालयाने दिला निर्णय

■ पनवेल

**डान्सबारविरोधातील** आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पनवेलमधील 'नाईट रायडर बार'ची तोडफोड करणाऱ्या मनसेच्या आठ कार्यकर्त्यांना पनवेल न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या इशाऱ्यानंतर ही तोडफोड झाली.

या प्रकरणी मनसे नेते योगेश चिले यांच्यासह १५ जणांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी शोधमोहीम राबवून योगेश चिले व आठ कार्यकर्त्यांना अटक केली होती. अटकेनंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. सुरुवातीला न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर त्यांनी जामिनासाठी अर्ज केला होता. न्यायालयाने चिले यांच्यासह आठ जणांना जामीन मंजूर केला आहे.

शनिवारी रात्री उशिरा कोनगावमधील बारवर मनसे कार्यकर्त्यांनी धडक कारवाई केली होती. या तोडफोडीत बारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.

## तंबाखूविरहित हर्बल हुक्का देणाऱ्या हॉटेल मालकांची हायकोर्टात धाव

■ मुंबई

**कायद्याने** परवानगी असलेला तंबाखूविरहित हर्बल हुक्का (वनौषधीयुक्त) ग्राहकांना देणाऱ्या रेस्टॉरंट मालकांवर मुंबई पोलीस कारवाई करीत आहेत. या विरोधात १२ रेस्टॉरंट मालकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने २२ ऑगस्ट २०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्यात तंबाखूविरहित हर्बल हुक्का विकण्यास परवानगी देण्यात आली आहे. असे असताना मुंबई पोलीस रेस्टॉरंट मालकांना नाहक त्रास देतात. आगाऊ सूचना दिल्याशिवाय कधीही धाड टाकतात. हुक्का जप्त करतात आणि हर्बल हुक्का बंद करण्यासाठी धाक दाखवतात. पोलिसांचे हे कृत्य उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणारे आहे, असा दावा या मालकांच्या वतीने ॲड. राजेंद्र राठोड आणि ॲड. ध्रुव जैन यांनी केला. या मालकांचे म्हणणे आहे की, ६ जून २०२५ रोजी राज्य सरकारने एक परिपत्रक जारी करून बेकादेशीरपणे हुक्का पार्लर चालविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलिसांना दिले.हे परिपत्रक तंबाखूविरहित हर्बल हुक्का विकणाऱ्यांना लागू होत नाही. तरीही केवळ त्या परिपत्रकाच्या आधारे पोलीस कारवाई करत आहेत.

## पंढरपुरात शिंदेसेनेचे दोन गट भिडले

■ सोलापूर

**सोलापूर** जिल्ह्यातील पंढरपूरमध्ये आज शिवसेना शिंदे गटाचे दोन गट एकमेकांना भिडले. यामुळे पक्षांतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली.

सोलापुरात पदाधिकारी या राजीनामासत्रानंतर आज आमदार संजय कदम यांच्या उपस्थितीत पक्षाची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत सावंत गट आणि महेश साठे गटाचे समर्थक एकमेकांना भिडले. माजी मंत्री तानाजी सावंत यांचे बंधू शिवाजी सावंत यांनी पक्ष निर्णयातून डावलल्यामुळे पक्षातील पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर ११ आणि २१ सावंत समर्थक पदाधिकाऱ्यांनी अनुक्रमे पदाचे राजीनामे दिले होते.

## उत्तर प्रदेशात पूरस्थितीमुळे शाळा-महाविद्यालयेही बंद

■ लखनौ

**उत्तर** प्रदेशात गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा कहर सुरू असून आज लखनौसह राज्याच्या अनेक भागांतील शाळाही बंद ठेवण्यात आल्या. राज्यातील गंगा, यमुनासह अनेक नद्यांना पूर आले आहेत.

उत्तर प्रदेशात १७ जिल्ह्यांमध्ये पावसाचा कहर सुरू आहे. नद्यांना आलेल्या पुरामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. आज सकाळी सीतापूर जिल्ह्यात एक भिंत पडल्याने त्याखाली दबून दोन मुलींचा मृत्यू झाला. त्यामुळे राज्यातील मृतांची संख्या ११ वर गेली आहे. राज्यात कानपूर शहर, लखीमपूर खिरी, आग्रा, औरैया, चित्रकूट, बलिया, बांदा, गाजीपूर, मिर्झापूर, प्रयागराज, वाराणसी, चंदौली, जालौन, कानपूर ग्रामीण, हमीरपूर, इटावा व फतेहपूरमध्ये अनेक भागांत पाणी भरले आहे. एनडीआरएफ व राज्य आपत्ती दलाच्या जवानांनी अनेक ठिकाणी मदतकार्य सुरू केले असून, आतापर्यंत



अनेक लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. आतापर्यंत ४७ हजार ९०६ लोकांना मदतसामुग्री देण्यात आली तर काही ठिकाणी पाळीव जनावरांनाही सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. पुरामुळे ३४३ घरे पडल्याचे मदत आयुक्त भानु चंद्र गोस्वामी यांनी म्हटले आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये बोटींच्या सहाय्याने लोकांपर्यंत अन्नाची पाकिटे व इतर साहित्य पुरवले जात आहे. पूरग्रस्तांसाठी जागोजागी २९ लंगर स्थापन करण्यात आले आहेत.

## दोन रुपये फी घेणाऱ्या डॉक्टर ए. के. रायरू गोपाल यांचे निधन

■ तिरुवनंतपूरम



**केरळमधील** कन्नूर येथे गेली पाच दशके केवळ दोन रुपयांत उपचार करून कोट्यवधी रुग्णांचे जीव वाचवणारे आणि जनतेचे डॉक्टर म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए. के. रायरू गोपाल (८०) यांचे काल निधन झाले. केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी डॉक्टर गोपाल यांच्या निधनानंतर शोक व्यक्त केला आहे.

डॉ. गोपाल यांनी कन्नूरमधील लक्ष्मी या त्यांच्या राहत्या घरीच दवाखाना उघडला होता. ते पहाटे ४ ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत रुग्णांवर उपचार करत. वयोमानानुसार प्रकृती अस्वास्थ्यामुळे अखेरच्या काही महिन्यांमध्ये ते पहाटे चारऐवजी सहा वाजता दवाखाना उघडत. ते रुग्णांकडून फक्त दोन रुपये फी आकारत असल्यामुळे दोन रुपयेवाले डॉक्टर, जनतेचे डॉक्टर अशी त्यांची ओळख बनली होती. दररोज शेकडो रुग्ण त्यांच्याकडे उपचारासाठी येत. विशेष म्हणजे, ज्या रुग्णांकडे औषधे खरेदी करण्यासाठी पैसे नसत, त्यांना ते औषधेही देत. मे २०२४ मध्ये तब्येत खूपच खालावल्याने त्यांना दवाखाना बंद करावा लागला होता.

## बांके बिहारी अध्यादेशाची अनाठायी घाई करू नका

### सुप्रीम कोर्टाने फटकारले

■ नवी दिल्ली

**उत्तर** प्रदेशमधील वृंदावनमधील सुप्रसिध्द बांके बिहारी मंदिराचा कारभार आपल्या हाती घेण्याबाबतच्या अध्यादेशाबाबत योगी सरकार दाखवत असलेल्या तत्परतेवरून सर्वोच्च न्यायालयाने सरकारला फटकारले. बांके बिहारी अध्यादेशाची अतिघाई करू नका, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला सुनावले.

न्या. सूर्यकांत आणि न्या. ज्योयमल्ल्या बागची यांच्या खंडपीठासमोर आज बांके बिहारी मंदिरासंबंधीच्या याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी न्यायालयाने मंदिराच्या दानपेटीतील निधी मंदिर परिसराच्या नूतनीकरणावर खर्च करण्यास सर्वोच्च न्यायालयाकडून मिळवलेल्या मंजुरीवरूनही सरकारला फटकारले.

१५ मे रोजी झालेल्या सुनावणीत बांके बिहारी मंदिराची ५ एकर जमीन नूतनीकरणासाठी अधिग्रहित करण्याची सरकारची विनंती मान्य केली होती. मात्र ही ५ एकर जमीन बांके बिहारीच्या नावे करावी, अशी अट न्यायालयाने ठेवली होती. ती अट सरकारने पाळली नाही, असे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे न्यायालयाने सरकारला खडे बोल सुनावले. त्याचबरोबर १५ मे रोजी दिलेली मंजुरी रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करून न्यायालयाने या प्रकरणावर लक्ष ठेवण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमणार असल्याचे सांगितले.

## राज ठाकरेंविरोधातील याचिकेवर सुप्रीम कोर्टाने सुनावणी नाकारली

■ नवी दिल्ली

**मनसे** प्रमुख राज ठाकरे यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने आज नकार दिला आहे.

महाराष्ट्रात मराठी न बोलणाऱ्या उत्तर भारतीयांना लक्ष्य करत हिंदी भाषिक लोकांविरुद्ध हिंसाचार भडकवल्याचा आणि भाषिक द्वेष पसरवल्याचा आरोप करत राज ठाकरे यांच्याविरुद्ध उत्तर भारतीय विकास सेनेचे अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. त्यावर आज सरन्यायाधीश बी.आर. गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. यावेळी मुख्य न्यायाधीश बी.आर. गवई यांनी याचिकाकर्त्यांना मुंबई उच्च न्यायालय रजेवर आहे का, असा सवाल करत सुनावणी घेण्यास नकार दिला. त्यानंतर याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी तत्काळ याचिका मागे घेतली आणि तीच याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्याची परवानगी मागितली. न्यायालयाने याचिकेवर कोणतीही टिप्पणी न करता, उच्च न्यायालयात जाण्यास परवानगी दिली.

## पतंजली आणि डाबर यांच्यातील वाद मिटण्याची शक्यता मावळली

■ नवी दिल्ली




**योगगुरू** बाबा रामदेव यांच्या पतंजली आयुर्वेद लिमिटेडच्या दंतकांती रेड टुथपेस्टवरून डाबर इंडिया लिमिटेडने दाखल केलेल्या खटल्यात सहमतीने तोडगा काढण्याचा प्रयत्न अपयशी ठरल्याची माहिती दिल्ली उच्च न्यायालयात नुकतीच देण्यात आली. त्या अनुषंगाने या खटल्याची पुढील सुनावणी डिसेंबर महिन्यात घेण्याचे न्यायालयाने निश्चित केले आहे.

न्या. मनमित प्रीतम सिंग अरोरा यांच्या एकल पीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. या प्रकरणात डाबरचा असा दावा आहे की, पतंजली दंतकांती रेड टुथपेस्टने डाबरच्या लाल दंतमंजनच्या वेष्टनाची (पॅकिंग) हुबेहुब नक्कल केली आहे. पतंजलीने डिसेंबर २०२४ पासून पतंजली दंतकांती रेड टुथपेस्टसाठी हे नवे पॅकिंग वापरण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे ग्राहकांची दिशाभूल होण्याची शक्यता आहे. या खटल्याच्या मागील सुनावणीप्रसंगी न्यायालयाने दोन्ही कंपन्यांना आपापसात चर्चा करून उभयतर्फी मान्य होईल असा तोडगा काढण्याचे निर्देश दिले होते. मात्र चर्चे द्वारे काही तोडगा निघू शकलेला नाही, असे दोन्ही कंपन्यांच्या वतीने न्यायालयाला कळवण्यात आले. त्यामुळे आता खटल्याची रितसर सुनावणी डिसेंबरपासून सुरू होणार आहे.

## राज ठाकरेंचे पाहुणे बदलले जयंत पाटलांनंतर बच्चू कडू

■ मुंबई

शेकापच्या जयंत पाटील यांच्यानंतर ६ ऑगस्टला प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेणार आहेत. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात राज ठाकरेंचे पाहुणे बदलल्याची चर्चा रंगली आहे.

प्रहारचे बच्चू कडू म्हणाले की, माझ्या शेतकरी आंदोलनाला मनसेने पाठिंबा दिला होता. मनसे नेते बाळा नांदगावकर हे कडूंनी पुकारलेल्या आंदोलनात सहभागी झाले होते. त्यामुळे ६ ऑगस्टला होणाऱ्या भेटीत राज ठाकरे यांच्याशी शेतकरी, मेंढपाळ यांच्या समस्यांवर चर्चा करणार आहे.

मागील काही दिवसांपासून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर बच्चू कडू यांनी ग्रामीण भागात आंदोलन करत आहेत. शेतकरी कर्जमाफीचा मुद्दाही त्यांनी उचलून धरला आहे. निवडणुकीपूर्वी महायुतीने शेतकऱ्यांचा सात बारा कोरा करू असे सरकारने आश्वासन दिले होते. परंतु सत्तेत येऊन १० महिने उलटले तरीही सरकारने अद्याप शेतकरी कर्जमाफी केलेली नाही. त्यामुळे बच्चू कडू यांनी सरकारला जाब विचारला आहे.

## मालेगाव बॉम्बस्फोट निकाल आव्हान याचिकेसाठी आंदोलन

■ नाशिक

**नाशिक** जिल्ह्यातील मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात विशेष न्यायालयाने दिलेल्या निकालाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्याची मागणी करत आज मालेगावात निदर्शने करण्यात आली. या बॉम्बस्फोटातील मृतांच्या नातेवाईकांसह मायनोरिटी डिफेन्स कमिटीच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले.

मालेगाव बॉम्बस्फोटातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याचा निकाल विशेष न्यायालयाने दिला होता. या निकालाविरोधात राज्य शासनाने उच्च न्यायालयात दाद मागावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. माजी आमदार आसिफ शेख यांच्या नेतृत्वाखाली मालेगाव येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात धरणे धरण्यात आले. यावेळी सहाही मृतांच्या नातेवाईकांच्या हस्ते तहसीलदार विशाल सोनवणे यांना निवेदन देण्यात आले. या निकालाविरोधात राज्य शासनाने येत्या ८ दिवसांत उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.